महाराष्ट्र विधानपरिषद

दुसरे अधिवेशन, २०१५

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

मंगळवार, दिनांक २१ जुलै, २०१५ / आषाढ ३०, १९३७ (शके)

(१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री
(२) ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री
(३) जलसंपदा मंत्री
(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ७५

ढेबेवाडी (ता.पाटण, जि.सातारा) येथील महिंद धरण गाळाने भरल्याने धरणाच्या पाण्यात झालेली घट

(१) * ७७७० श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयंत पाटील, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढेबेवाडी (ता.पाटण, जि.सातारा) येथील महिंद धरण गाळाने भरल्याने धरणाच्या पाण्यात मोठ्या प्रमाणात घट झाली असून परिसर झाडाझुडपांनी व्यापला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार धरणातील गाळ काढणेबाबत व झाडाझुडपांनी व्यापलेला परिसर मोकळा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) हे अंशत: खरे आहे.

धरणावर झाडेझुडपे आहे ही वस्तुस्थिती आहे. धरण बांधल्यानंतर त्यामध्ये कालमानानुसार गाळ येतो व त्यासाठी अचल साठ्याची तरतूद केलेली असते. महिंद तलावाचा उपयुक्त पाणीसाठा ७०.०० दलघफू असून त्यामध्ये गाळाबाबत सर्वेक्षण झालेले नाही. तसेच उपयुक्त पाणीसाठयात गाळ असल्याचे आढळले नाही.

(२) संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी प्रकल्पाची पाहणी केली आहे.

(३) पाहणी दरम्यान धरणावर झाडेझुडपे वाढल्याचे निदर्शनास आले आहे. सद्य:स्थितीत धरणाच्या भरावावरील झाडे झुडपे काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

मात्र धरणातील साचलेला गाळ संपुर्णपणे काढणे हे सद्य:स्थितीत आर्थिक दृष्टया अव्यवहार्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात महिला वसतिगृहांची संख्या अत्यंत अपुरी असल्याने महिलांची होणारी गैरसोय

(२) * ८१६४ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिवसेंदिवस नोकरीसाठी व शिक्षणासाठी महिलांना अनेकदा दुसऱ्या शहरांमध्ये वास्तव्य करावे लागत असून राज्यात महिला वसतिगृहांची संख्या अत्यंत कमी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नवीन महिला वसतिगृहांची निर्मिती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबतचे शासनाचे धोरण काय आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) अंशत: खरे आहे.

(२) नोकरी करणाऱ्या महिलांच्या वसतिगृहांचे प्राप्त प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी शिफारस करुन पाठविण्यात येतात. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदरील योजना ही केंद्र शासन पुरस्कृत योजना असल्याने आवश्यकतेनुसार प्रस्ताव केंद्र शासनाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येतात.

हवेतील वाढत्या प्रदूषणामुळे मुंबईतील तसेच
राज्यातील मुलांचे आरोग्य बिघडल्याबाबत

(३) * ६९१५ श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे, प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहरातील वाढती बांधकामे, व्हेंटीलेशनचा अभाव, हवेतील प्रदूषण, वातावरणातील बदल व बदलत्या जीवनशैलीमुळे मुंबईत केलेल्या शालेय मुलांच्या पाहणीमध्ये १३ टक्के मुलांच्या फुफ्फुसांची कार्यक्षमता कमी असल्याची बाब ब्रेथ ब्ल्यू या संस्थेच्या निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच वरील कारणांमुळे राज्यातील ५ ते ११ वयोगटातील बालकांमध्ये दम्याचे विकार वाढत आहेत राज्यात ६ पैकी एका बालकाला अस्थमा असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी केली असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने शालेय विद्यार्थ्यांना वेळोवेळी मोफत आरोग्य तपासणी व बालकांमध्ये वाढीस लागलेल्या फुफ्फुसांच्या आजारांना आळा घालण्यासाठी व त्यांना औषधोपचार मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) अंशतः खरे आहे.

इंटरनेटच्या माध्यमातून शोध घेतला असता ब्रेथ ब्ल्यू सर्व्हेबाबत माहिती आढळून आली त्यामध्ये मुंबईमधील १३% मुलांमध्ये फुफ्फुसाची कार्यक्षमता कमी व १४% मुलांमध्ये फुफ्फुसाची कार्यक्षमता अतिशय कमी असल्याचे नमूद केले आहे.

(२) व (३) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत सन २०१४-२०१५ मध्ये राज्यातील शालेय तपासणी मध्ये ६ ते १८ वर्षे वयोगटातील एकूण १,२२,३६,१२८ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी १,१५,०५३ विद्यार्थी श्वसन संस्थेच्या विकाराने आजारी असल्याचे आढळून आले आहे. यापैकी १,१४,७१३ विद्यार्थ्यांवर औषधोपचार करण्यात आले असून उर्वरीत ३४० विद्यार्थ्यांना पुढील योग्य उपचारांसाठी वरीष्ठ रुग्णालयात संदर्भित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्ह्यातील नेर-धामणा पाटबंधारे प्रकल्पांच्या अंदाजपत्रकाबाबत

(४) * ७८६३ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील नेर-धामणा पाटबंधारे प्रकल्पांच्या कामावर किती खर्च करण्यात आला आहे,

(२) असल्यास, या प्रकल्पाचे अंदाजपत्रक किती होते,

(३) असल्यास, या प्रकल्पाच्या कामात कोणतीही अनियमितता झाली नसल्याचे चितळे समितीच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय ?

श्री. गिरीष महाजन : (१) अकोला जिल्ह्यातील पूर्णा बॅरेज-२ (नेर-धामणा) या प्रकल्पावर मे, २०१५ अखेर रु. ५९१.१८ कोटी खर्च झाला आहे.

(२) या प्रकल्पास महामंडळ स्तरावरुन मूळ प्रशासकीय मान्यता किंमत रु. १८१.९९ कोटी एवढया रकमेस व सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु. ६३८.३४ कोटी एवढया रकमेस देण्यात आली आहे.

(३) अंशत: खरे आहे.

विशेष चौकशी समिती अहवाल खंड १. प्रकरण २ मध्ये छाननी केलेल्या प्रकल्पात निदर्शनास आलेल्या अनियमितता नमूद आहेत पूर्णा बॅरेज प्रकल्पांबाबत सविस्तर सर्वेक्षण, अन्वेषण व त्यानुसार संकल्पचित्र करुन तांत्रिक मान्यता देणे आवश्यक होते अशा आशयाच्या अनियमिततेचा उल्लेख आहे.

मात्र समितीच्या अहवालात याबाबत असे नमूद करण्यात आले आहे की, प्रकल्पास किंमती वाढीसह केंद्रीय जल आयोगाची मान्यता आहे. तसेच रु. ६३८.३४ कोटी एवढया रकमेस महामंडळाने दिलेली सुधारित प्रशासकीय मान्यता सुसंगत असल्याचे समितीने नमूद केले आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना केलेला औषधाचा पुरवठा

(५) * ८०३६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा व कॅन्टोन्मेंट बोर्ड अशा ७५ स्थानिक स्वराज्य संस्थाकडून मागणी नसतांनाही नॅशनल अर्बन हेल्थ मिशन अंतर्गत साडेचार कोटी रुपयांचे सोडीयम हायड्रोक्लाराइडची खरेदी करण्यात आल्याचे दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) सदर औषधाची आवश्यकता नसल्याने ते विनावापर पडून मुदत बाह्य होवू नये म्हणून नाशिक महापालिकेने या औषधांचा ट्रक दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास आरोग्य सेवा संचालनालयास परत पाठवून दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुसरीकडे सिंहस्थासाठी सिव्हील हॉस्पिटल आणि जिल्हा परिषदेकडून आरोग्य सेवा संचालनालयाला औषधे खरेदीसाठी २७ वेळा स्मरणपत्रे देवूनही औषधे व साधनसामुग्री मिळत नसल्यामुळे सिंहस्थात आरोग्य विभागासमोर यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

डॉ. दीपक सावंत : (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील एकूण ९५ स्थानिक स्वराज्य संस्था व इतर ग्रामीण आरोग्य संस्था यांनी केलेली मागणी विचारात घेऊन एकूण रु. ४,४२,९७,९७०/- एवढया रकमेचे सोडियम हायपोक्लोराइड खरेदी करण्यात आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

नाशिक महानगरपालिकेची औषधाची मागणी तेथील ४ रुग्णालये, १७ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि तेथे आयोजित करण्यात येणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळाच्या निमित्ताने जमा होणारा जनसमूदाय विचारात घेऊन लोकसंख्येच्या प्रमाणात मागणी पेक्षा थोडा अधिकचा सोडियम हायपोक्लोरोइडचा पुरवठा नाशिक महानगरपालिकेस करण्यात आला होता. परंतु सदर औषधाचा साठा करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने आवश्यकतेनुसार औषधाचा साठा नाशिक मनपाने ठेवून उर्वरित औषधे पुरवठादाराकडे परत पाठविण्यात आली.

(३) हे खरे नाही.

सहसंचालक आरोगय सेवा राज्यस्तर, मुंबई यांचेकडून सिंहस्थ कुंभमेळाच्या नियोजनासाठी रु.२,३९,२२,३८२/- एवढा निधी उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ, नाशिक यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना
मानधन तसेच दिवाळी भेट देणेबाबत

(६) * ७२०९ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.सुभाष झांबड, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक ३९२७ ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेला उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: दोडामार्ग (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग), अकोट (जि.अकोला) येथे एकात्मिक बालविकास सेवा योजनेतील अंदाजे २ लाख २० हजार अंगणवाडी महिला कर्मचारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचे वेतन गेल्या १० महिन्यांपासून रखडले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १ एप्रिल २०१४ पासून अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ करण्याचे आदेश शासनाने काढूनही उक्त रक्कम अदा केलेली नाही. तसेच ऑक्टोबर २०१४ पासून शासनाने त्यांचे मानधनही बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मानधन व वाढीव मानधन रखडल्याने संतप्त अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी दोडामार्ग येथील एकात्मता बालविकास प्रकल्प कार्यालयासमोर दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी निदर्शने व माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान सोलापूर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ऑगस्ट महिन्यापासून राज्याचा तर डिसेंबरपासून केंद्राच्या वेतनाकरिता असलेला निधी प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना मानधन, वाढीव मानधन तसेच दिवाळी भेट देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.
(२) दिनांक ०१ एप्रिल, २०१४ पासून अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांच्य मानधनात केलेली वाढ निधीची तरतूद न झाल्याने अदा करता आली नाही. तथापि शासनाने अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना नियमित देण्यात येणारे मानधन बंद केलेले नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना वाढीव मानधन व भाऊबीज भेट देण्यासाठी पुरवणी मागणी सादर केलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या विकास मंडळांना ५ वर्षासाठी मुदतवाढ देण्याबाबत

(७) * ६६६४ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १ मे, २०१५ पासून पुढील ५ वर्षासाठी राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या विकास मंडळांना मुदतवाढ देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विकास मंडळामार्फत चालू आर्थिक वर्षात किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला वा येत आहे,
(३) सदर विकास मंडळांना सन १९९४ पासून सातत्याने मुदतवाढ देण्यात येत असून या कालावधीत सदर मागास भागांचा अनुशेष दूर होण्यासाठी किती मदत झाली याचा आढावा घेण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, सदर आढाव्याचे निष्कर्ष काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) होय, हे खरे आहे. मा.राष्ट्रपतींनी राज्यातील तिन्ही विकास मंडळांना दिनांक ०१ मे, २०१५ पासून पुढील ५ वर्षासाठी मुदतवाढ दिली आहे.
(२) सन २०१५-१६ करिता निधी वितरित करण्यास मा.राज्यपालांनी मान्यता दिलेली नाही.
(३) व (४) विकास मंडळांच्या स्थापनेनंतर गठीत करण्यात आलेल्या निर्देशांक व अनुशेष समितीने ९ विकास क्षेत्रातील निश्चित केलेल्या वित्तीय अनुशेषापैकी सार्वजनिक आरोग्य वगळता इतर विकास क्षेत्रांचा वित्तीय अनुशेष दूर झालेला आहे. तर, जलसंपदा, सार्वजनिक आरोग्य, ऊर्जा व उच्च व तंत्र शिक्षण वगळता इतर विकास क्षेत्रातील भौतिक अनुशेष दूर झालेला आहे.

खामगांव (जि.बुलढाणा) येथील ज्ञानगंगा प्रकल्पाला सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत

(८) * ८१३७ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०५४ ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील ज्ञानगंगा प्रकल्पाचे काम मागील २ वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाला सुधारीत प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे सदर कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाला सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) अंशत: खरे आहे, सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी प्रकल्पाचे काम जून १२ पासून बंद होते. तथापि सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात वितरीत झालेल्या तरतुदीच्या मर्यादेत खर्च करण्यास परवानगी प्रदान केल्यामुळे प्रकल्पाचे काम ऑक्टोबर २०१४ पासून पुन्हा सुरु करण्यात आले आहे.
(२) नाही.
(३) सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव नियोजन विभागात छाननीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अंगणवाडयांना पुरविण्यात येणारा निकृष्ट पोषण आहार

(९) * ७१३२ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडयांमधील मुलांना पोषण आहार (टीएचआर) पुरवूनही मुले मोठया प्रमाणात कुपाषित असल्याचे अखिल भारतीय अंगणवाडी सेविका फेडरेशन या अंगणवाडी व बालविकास क्षेत्रात काम करणाऱ्या संघटनेने माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणून दिले, हे खरे आहे काय,

(२) तसेच शासनाने सन २०१४-१५ या वर्षात घरपोच आहार योजनेवर ९२८ कोटी रुपये खर्च करण्यात आला असून त्यातला मोठा हिस्सा महालक्ष्मी, महाराष्ट्र आणि व्यंकटेश्वरा या तीन संस्थांकडे गेल्या १० वर्षापासून असून सदरील कंपन्यांद्वारे देण्यात येणारी आहाराची पाकिटे निकृष्ट दर्जाची आढळल्याने या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दखल घेत तीनही संस्थाची चौकशी समिती नेमली असल्याचे माहे मे, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थाना कायम ठेका देणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर व निकृष्ट दर्जाचा पोषण आहार पुरविणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सन २००९ मध्ये घरपोच आहार (THR) महिला बचत गट/महिला मंडळे/ग्राम समुदाय यांचेकडून पुरवठा करण्यासाठी आयुक्तालयामार्फत अर्ज मागविले होते. त्यामध्ये ३ महिला संस्थांचे १०२ अर्ज पात्र ठरले असून त्यांना THR चा पुरवठा करण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर THR पुरवठयाचा कालावधी माहे जून २०१३ मध्ये संपुष्टात आल्यामुळे आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांनी त्यांच्या दि. २४/०५/२०१३ च्या पत्रान्वये THR चा पुरवठा करण्यासाठी जिल्हास्तरीय आहार समितीमार्फत स्थानिक महिला बचतगट/महिला मंडळ/ग्राम समुदाय यांची निवड प्रक्रिया पुर्ण करण्याबाबत सूचित केले.

त्यानूसार सध्यस्थितीत राज्यातील ५५३ प्रकल्पांपैकी ३१४ प्रकल्पांमध्ये स्थानिक महिला बचत गट/महिला मंडळ/ग्राम समुदाय यांची जिल्हास्तरीय आहार समितीमार्फत निवड करुन त्यांचेमार्फत THR आहार पुरवठा सुरु आहे.

मध्यंतरीच्या काळात THR चा पुरवठा अखंडीतपणे सुरु ठेवण्यासाठी पात्र व सक्षम महिला बचत गट तयार होईपर्यंत पूर्वीच्या ०३ महिला संस्थाकडून लाभार्थ्यांना THR चा पुरवठा सुरु ठेवण्यास मान्यता देऊन तसेच याबाबत कोणतीही अंतिम मुदत (Any timr deadline) न ठेवता THR चा पुरवठा करण्यासाठी महिला बचत गटांची प्रकल्प स्तरावर अंतिम निवड झाल्याबरोबर पूर्वीच्या ०३ महिला संस्थामार्फत सुरु असलेला THR चा पुरवठा बंद करुन स्थानिक बचत गटांकडे शक्य तितक्या तातडीने हस्तांतर करणेबाबतच्या सुचना दि. १२/०७/२०१३ च्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

गोंडवाना विद्यापिठाकरीता जमीन उपलब्ध करुन देणेबाबत

(१०) * ७४२८ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया : तारांकित प्रश्न क्रमांक २६७५ ला १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाचा ३७५ एकर जमिनीचा प्रस्ताव वन विभागाकडे पाठवून सदर प्रस्तावाला मंजूरी देण्यात आली नसल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर न करण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच गोंडवाना विद्यापीठाकरिता वनजमीन वळती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१), (२), (३), व (४) गोंडवाना विद्यापीठाकरीता गडचिरोली जिल्ह्यातील १६०.०६ हेक्टर वनजमिन मागणीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे दिनांक २१/०९/२०१३ रोजीच्या पत्रान्वये प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सादर केला होता. सदर पत्रात त्यांनी प्रस्तुत प्रस्ताव नामंजूर करण्याची शिफारस केली होती. प्रस्तुत प्रकरणाचा सर्वंकष विचार करुन राज्य शासनाने गोंडवाना विद्यापीठाकरीता वनजमिन वळतीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनास शिफारस न करण्याचा निर्णय घेतला होता. तथापि याबाबत पुनर्विचार करण्यात येत आहे.

गेवराई (जि.बीड) येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेच्या जागेत अतिक्रमण झाल्याबाबत

(११) * ७४७६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद माध्यमिक मुलांची शाळा (ता.गेवराई, जि.बीड) येथील शाळेच्या मालकीच्या जागेत बिअर बार परमिटरुम सह अनेक व्यावसायिकांनी अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेच्या मालकीच्या सर्व्हे नं.५८ मधील ८ एकर २९ गुंठे जागेवर बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याची कबुली शपथपत्राद्वारे तहसिलदार, गेवराई यांनी दिनांक १७ एप्रिल, २०१५ रोजी उच्च न्यायालयात दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळेच्या जागेतील अतिक्रमण दूर करण्यासंदर्भात जिल्हा परिषद सदस्य यांनी दिनांक २५ मे, २०१५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., बीड यांच्याकडे मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा परिषद शाळेच्या मैदानासह इतर जागेत झालेले अतिक्रमण हटविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) व (२) अंशतः खरे आहे.

तथापि, या जागेवरील अतिक्रमण हटविण्यासंबंधी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र.१४/२०१५ दाखल झाली होती. सदर याचिका निकाली काढण्यात आलेली आहे. तथापि, या जागेच्या मालकी हक्काबाबत दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) बीड येथे दावा दाखल असून ते न्याय प्रविष्ट आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) न्यायालयीन निर्णयानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरात औद्यागिक क्षेत्रात कार्य करणा-या कामगारांकरिता कामगार रुग्णालयात सोईसुविधा पुरविण्याबाबत

(१२) * ७३३७ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात औद्योगिक क्षेत्रात कार्य करणा-या कामगारांकरिता कामगार रुग्णालय आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात सुमारे १ लक्ष कामगार असून सदर रुग्णालय त्यांचे सोयीकरीता परिपूर्ण नसून डॉक्टर व इतर कर्मचारी यांची संख्या अपूरी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर रुग्णालयात उपचाराकरिता लागणारी यंत्रसामुग्री उपलब्ध नाही, हे खरे काय,

(४) असल्यास, सदर रुग्णालयात सोईसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत सदर रुग्णालयातील एकूण मंजुर पदांपैकी सुमारे ६५% पदे रिक्त आहेत.

रिक्त पदांमुळे रुग्ण सेवेत अडथळा निर्माण होऊ नये याकरिता वेळोवेळी राज्य कामगार विमा महामंडळामार्फत कंत्राटी पध्दतीने तात्पुरता स्वरुपात १ वर्षाच्या कालावधी करिता अंशकालीन विशेषज्ञांची तसेच शासनामार्फत बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी व परिचारीकांची नियुक्ती करण्यात येते व विमा रुग्णांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) सन २०१४ मध्ये सदर रुग्णालयातील एकूण ४ विशेषज्ञांची पदे पदोन्नतीने भरली असून रुग्णालयाच्या आस्थापनेवरील ३ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या समावेशनाबाबत कार्यवाही सुरु आहे. परिचारीका, समवैद्यकीय व लिपिका संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

रुग्णालयासाठी वैद्यकीय उपकरणे व यंत्रांच्या खरेदीची प्रक्रिया प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथील आश्रमशाळेतील मुलांना बेकायदेशीररित्या गोव्यामध्ये नेऊन त्यांचे लैंगिक शोषण केल्याबाबत

(१३) * ६७३८ डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील आश्रमशाळेतील मुलांना बेकायदेशीररित्या गोव्यामध्ये नेऊन त्यांचे लौंगिक शोषण केल्याची घटना दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर येथील कावळानाका परिसरात कोरीयन नागरिक व एक स्थानिक नागरिक यांच्याकडून चालविण्यात येत असलेल्या संस्थेतर्फे आश्रमशाळा सुरु होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

तथापि अशा आशयाची बातमी, tv९ या खाजगी दूरदर्शन वाहिनींवर दि. २४/४/२०१५ रोजी प्रसिध्द झाली आहे. मात्र सदरची मुले हि महिला व बाल विकास विभागातंर्गत मान्यताप्राप्त संस्थांमधील नाहीत. सदरची मुले मेरी वॉन्लेस हॉस्पिटल, कोल्हापूर येथे औषधोपचारार्थ दाखल होती.

(२) हे अंशत: खरे आहे.

तथापि, महिला व बाल विकास विभागाअंतर्गत मान्यताप्राप्त अशी कोणतीही संस्था नाही सदर ठिकाणी मेरी वॉन्लेस हॉस्पिटल, हे चर्च कॉन्सिल, कोल्हापूर यांचे मार्फत चालविले जात असून सदर चर्च संस्थेने S.F.I. (Srving Friends India) या संस्थेस ७ वर्षासाठी चालविणेस देण्यात अली होती. S.F.I.या संस्थेचे प्रेसिडेंट म्हणून Shri Ekuk kook (श्री. इकुक कुक) हे काम पाहत होते. S.F.I.या संस्थेचे सन २०१२ मध्ये अगापे टोटल मेडिकेअर एन्टरप्रायझेस प्रायव्हेट लिमिटेड या नांवे मेरी वॉन्लेस हॉस्पिटल, कोल्हापूर, हे श्री. इमॅन्युअल गायकवाड या व्यक्तीमार्फत चालविले जात होते. या संस्थेमार्फत हॉस्पिटलमध्ये HIV बाधित मुलांना मोफत औषधोपचार केले जात होते.

(३) होय.

T.V-९ या खाजगी दूरचित्रवाहिनीवर प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमातील तरतुदीनुसार जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय, कोल्हापूर व श्रीमती चोरगे, अध्यक्षा, बाल कल्याण समिती, कोल्हापूर यांचेमार्फत दिनांक २५.४.२०१५ रोजी मेरी वॉन्लेस हॉस्पिटल, कोल्हापूर या ठिकाणी गोव्यामध्ये सापडलेल्या मुलांच्याबाबत चौकशी केलेली आहे. सदर ठिकाणी मुले औषधोपचारार्थ दाखल करण्यात आलेली होती.

तसेच सदर घटनेबाबत पणजी पोलीस ठाणे, गोवा येथे फिर्याद क्र. ७६/१५, दिनांक १६.३.२०१५ नुसार गुन्हा नोंद झाला आहे. तसेच पणजी पोलिस ठाण्याचे तपासणी अधिकारी इन्सपेक्टर श्री. विक्रम यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी सदरहू मुलांची वैद्यकीय तपासणी गोवा मेडिकल कॉलेज येथे करण्यात आलेली असून सदर बालकांचे वैद्यकीय अहवाल न्यायालयात दाखल केलेले आहेत. सदर मुलांवर लैंगिक अत्याचार झाले नसल्याबाबतही त्यांनी सांगितले आहे. संबंधित प्रकरणातील आरोपीबाबतचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेले असून सदर प्रकरण सध्या गोवा येथील न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे अशी मौखिक माहिती त्यांनी दिली. तसेच संबंधितांविरुध्द अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा अधिनियम, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम व भारतीय दंड विधान संहिता नुसार गुन्हा नोंद करुन योग्य ती कायदेशीर कार्यवाही करणे विषयी जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय, कोल्हापूर यांनी शाहुपुरी पोलिस स्टेशनला लेखी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महिला कर्मचाऱ्यांना व शिक्षिकांना २ वर्षाची
बाल संगोपन रजा मंजूर करण्याबाबत

(१४) * ७६७९ श्री.कपिल पाटील, श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारच्या सेवेतील व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला कर्मचारी व अधिकारी तसेच अनुदानित शाळा महाविद्यालयातील महिला शिक्षक व शिक्षकेत्तर महिला कर्मचारी यांना बाल संगोपनासाठी दोन वर्षापर्यंत केंद्राप्रमाणे भरपगारी रजा देण्याबाबत आणि पुरुष कर्मचाऱ्यांना पॅटर्निटी लिव्ह देण्याबाबत राज्य सरकारी कर्मचारी संघटना, शिक्षक भारती आणि महिला संघटनांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(३) या निर्णयाचे स्वरुप काय ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) राज्य शासनात महिला कर्मचाऱ्यांची मोठी संख्या आहे व त्यांना २ वर्षाची बालसंगोपन रजा लागू केल्यास शासकिय कामकाजावर होणारा विपरीत परिणाम विचारात घेऊन अशी रजा देण्याचे धोरण लागू न करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. पुरूष कर्मचा-यांना पॅटर्निटी लिव्ह देण्याबाबत धोरण ठरविण्याची बाब विचाराधीन नाही.

परभणी जिल्ह्यात कृषी विभागामार्फत जलसंधारणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

(१५) * ७२५६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २८०६ ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:
सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील कृषि विभागातर्फे मृदसंधारण, जलसंधारण, पाणलोट व इतर कामात कोटयवधी रुपयांचा गैरप्रकार करणा-या सर्व यंत्रणांची राज्यस्तरावरील विशेष भरारी पथकामार्फत चौकशी करुन कारवाई करण्यात यावी अशी मागणी मराठवाडा जनता विकास परिषदेच्या वतीने प्रधान सचिव, कृषी यांच्याकडे केल्यावरुन त्यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रधान सचिव, कृषि विभाग यांच्या स्तरावरील विशेष भरारी पथकाद्वारे मागील तीन वर्षातील सर्व कामांची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले तसेच दोषी स्थानिक अधिकारी, कंत्राटदार, समित्या यांच्या संगनमताने केवळ कागदोपत्रीच करण्यात आलेल्या कोटयवधी रुपयांच्या गैरप्रकाराबाबत त्यांच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) प्रस्तुत प्रकरणी जलसंधारण विभागाने चौकशीचे आदेश दिलेले आहेत.

(२) दक्षता पथकाकडे प्राप्त झालेल्या परभणी जिल्ह्यातील एकूण ८ तक्रार प्रकरणांपैकी ६ तक्रार प्रकरणांची चौकशी पूर्ण झाली असून २ प्रकरणी चौकशीची कार्यवाही सुरू आहे.
(३) व (४) कृषि आयुक्त कार्यालयात चौकशी अहवालाची छाननी चालू असून त्यामध्ये दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

मेळघाट (जि.अमरावती) येथे मलेरियाची औषधे मिळत नसल्याने बालकांचा झालेला मृत्यू

(१६) * ७८४० श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट (जि.अमरावती) येथे गेल्या पाच महिन्यात कुपोषणामुळे १५० बालकांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामागे कुपोषण हे एकमेव कारण नसून मलेरियाची औषधे वेळेत उपलब्ध न झाल्याने बरेच मृत्यू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) अंशतः खरे आहे.

माहे जानेवारी, २०१५ ते माहे मे, २०१५ या पाच महिन्यात मेळघाट भागात ० ते ६ वर्ष वयोगटातील ९० बालकांचे विविध आजाराने मृत्यू झालेले आहेत.
(२) हे खरे नाही.

मेळघाट येथे मलेरियाने एकही मृत्यू झालेला नाही. तसेच मलेरियाची औषधे मेळघाटसह सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात मागणीप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

(३) सदर बालमृत्यूचा आढावा घेण्यात आलेला असून सदर बालमृत्यू हे प्रामुख्याने कमी वजनाचे व जन्मतः व्यंग असणारे बालक, न्युमोनिया, सेप्टीमिया अशा एकूण २२ विविध आजारांनी झाल्याचे आढळून आले आहे. बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी व कुपोषणाला आळा घालण्यासाठी शासनाकडून पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येते.

१) जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम

२) जननी सुरक्षा योजना

३) भरारी पथक योजना

४) मातृत्व अनुदान योजना

५) ग्राम बाल विकास केंद्र (VCDC)

६) बाल उपचार केंद्र (CTC)

७) पोषण पुर्नवसन केंद्र (NRC)

८) जिवनसत्व अ व जंतनाशक मोहिम

९) आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष

१०) नियमित लसीकरण योजना

११) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम

१२) माता आरोग्य कार्यक्रमामध्ये गरोदर मातांची नोंदणी केली जाते. तसेच त्यांची तपासणी केली जाते व धनुर्वाताचे इंजेक्शन्स व लोहयुक्त गोळ्या दिल्या जातात.

१३) त्याचबरोबर जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत गरोदर मातांना प्रसूतीपूर्वी, प्रसूतीदरम्यान व प्रसूतीपश्चात आणि ० ते १ वर्षे वयोगटातील बालकांना मोफत सेवा देण्यात येतात. यामध्ये लाभार्थ्यांना घरापासून आरोग्य संस्थेपर्यंत तसेच संस्थेतून परत घरी मोफत वाहतूक सुविधा देण्यात येते. आरोग्य संस्थेमध्ये दाखल झाल्यावर मोफत आहार, मोफत रोगनिदान, मोफत औषधे व उपचार करणे इत्यादी सुविधा देण्यात येतात.

१४) जननी सुरक्षा योजनेअंतर्गत आरोग्य संस्थेत प्रसुतीच्या प्रमाणात वाढ होण्यासाठी राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील दारिद्र्य रेषेखालील, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कुटुंबातील गर्भवती मातांना प्रसुतीपश्चात आर्थिक लाभ देण्यात येतो.

तसेच VCDC/CTC द्वारे कुपोषित बालकांना आवश्यक सुविधा व उपचार पुरविण्यात येऊन कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. आदिवासी क्षेत्रातील नवसंजीवनी क्षेत्रांतर्गत येणाऱ्या प्रकल्पातील लाभार्थ्यांना अतिरिक्त पोषण मुल्य असणारा आहार पुरविण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कुपोषणामुळे आदिवासी व ग्रामीण भागातील मुलींचे होणारे मृत्यू

(१७) * ६८८५ श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.सुभाष झांबड, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.शरद रणपिसे, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुपोषणामुळे ८०११ आदिवासी आणि ग्रामीण भागातील मुलींचा मृत्यू झाल्याची घक्कादायक माहिती माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नंदुरबार, ठाणे जिल्हा कुपोषणात अव्वल स्थानावर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००९ ते २०१४ या पाच वर्षात एकात्मिक बालविकास सेवा योजनेसाठी शासनाला ४६,७३० कोटी रुपये रक्कम प्राप्त होऊन त्यातील ४,२३६ कोटी रुपये खर्च होऊनही कुपोषणामुळे मृत्यू होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील कुपोषणामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

मासिक प्रगती अहवालानुसार राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडीतील ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलींची बालमृत्युबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

वर्ष	एकुण जिवंत जन्म (०-१ वर्ष मुली)	०-१ वर्ष मुलींचा मृत्यू	IMR	१-६ वर्ष मुलींचा मृत्यू
२००९-१०	४६२७३५	९६९८	२१	३१०७
२०१०-११	४६२४०२	९१५०	२०	३१४५
२०११-१२	४९०२२१	८१९५	१७	२५५१
२०१२-१३	४९९६१२	८४७८	१७	२२७२
२०१३-१४	४९३५७५	७४२१	१५	१९९२
ऑक्टोबर-२०१४	५७७९	१२८	२२	१७२

वरील तपशिल पाहता बालमृत्यूच्या टक्केवारीत घट झाल्याचे दिसून येते.

(२) हे खरे आहे.

माहे ऑक्टोबर, २०१४ च्या मासिक प्रगती अहवालानुसार नंदुरबार (६.७३) व ठाणे (२.६१) हे जिल्हे कुपोषणात अव्वल स्थानावर आहे.

(३) सन २००९-२०१० ते २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात आहार खर्चांतर्गत रु.४८५५,४२,९१,०००/- इतका निधी प्राप्त झाला असून तो पूर्णपणे खर्च देखील झालेला आहे.

सदरचे बालमृत्यु हे कुपोषणामुळे झालेले नसुन १) न्युमोनिया, २) दुर्धर आजार, (३) तिव्र ताप, (४) मलेरिया, ५) गोवर, (६) जुळे जन्म, (७) अपुऱ्या दिवसाची प्रसुती, (८) जन्मत: कमी वजन, (९) अतिसार, (१०) सिकलसेल, (११) अस्थमा, (१२) श्वासावरोध, (१३) टी.बी, (१४) कावीळ, (१५) डेंगुमलेरिया, (१६) मेंदुज्वर, (१७) रक्तक्षय, ॲनिमीया, (१८) धनुर्वात, (१९) डांग्याखोकला इ. विविध आजार व संसर्गजन्य आजारामुळे झालेले आहेत.

(४) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत नियमित आहाराव्यतिरिक्त अतिरिक्त पौष्टीक मुल्य असलेली खाद्य पदार्थ, अंडी/केळी तसेच विविध प्रकाराची आरोग्यदायी औषधे इ. चा पुरवठा अंगणवाडीतील लाभार्थींना निधीच्या उपलब्धते नुसार केला जातो. आदिवासी क्षेत्रातील नवसंजीवन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या प्रकल्पातील लाभार्थ्यांना अतिरिक्त पोषणमुल्य असणारा आहार पुरविण्यात येतो. तसेच अंगणवाडीतील बालके, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांची दरमहा आरोग्य विभागाकडून तपासणी करण्यात येते व त्यानुसार संदर्भ सेवा देण्यात येतात. तसेच आरोग्य तपासणी करण्यात येते व त्यानुसार संदर्भ सेवा देण्यात येतात. तसेच आरोग्य तपासणी दरम्यान बालके तीव्र कमी वजनाची आढळल्यास सदर बालकांना ग्राम बालविकास केंद्रामध्ये भरती केले जाते व सदर बालके साधारण स्थितीत आल्यानंतर त्यांना घरी पाठविण्यात येते. अंगणवाडीतील बालकांना आरोग्य सेवा पुरविण्याकरिता आरोग्य विभागाशी योग्य तो समन्वय साधण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना करण्यात आलेल्या साडी वाटपामध्ये झालेला गैरव्यवहार

(१८) * ८०८४ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेने जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांना ड्रेसकोड नियमानुसार साडया खरेदी करण्यासाठी रक्कम ३३ लाख १७ हजार ९७५ रुपये इतकी रक्कम प्रकल्प स्तरावर वाटप करण्यासाठी दिनांक २९ ऑक्टाबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास अदा करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार अंगणवाडी कर्मचाऱ्यांना प्रत्येकी रुपये ४२५ इतकी रक्कम वाटप करण्याचे निश्चित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे व पालघर जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यासह अन्य तालुक्यांमध्ये अंगणवाडी सेविकांना रुपये ४२५ ऐवजी रुपये २०० इतकीच रक्कम देण्यात आल्याचे तसेच अनेक रिक्त पदावरील व गैरहजर कर्मचाऱ्यांनाही रक्कमा दिल्याचे दाखवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) ठाणे जिल्हा परिषदेने सन २०१४-१५ मध्ये अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविकांना गणवेश व बॅचेससाठी प्रत्येकी रु.४२५/- प्रमाणे एकूण रु.३६,८८,५७५/- प्रकल्पनिहाय गटस्तरावर वाटप करण्यात आले आहे. पंचायत समिती स्तरावरुन सदर रक्कम संबंधित अंगणवाडी कर्मचा-यांच्या बँक खात्यात जमा केलेली आहे.

(२) होय,

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

माणगाव ग्रामपंचायत (जि.रायगड) येथील ग्रामसेवकाने केलेला आर्थिक गैरव्यवहार

(१९) * ६६९६ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३५९२ ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगाव (जि.रायगड) येथील ग्रामसेवक श्री.भूपेश पांडूरंग अहिरे यांनी सन २०१०-११ ते सन २०१४-१५ अखेर कोणत्या स्वरुपाचे आर्थिक गैरव्यवहार केले व अनियमतता केली आहे,

(२) असल्यास, ग्रामसेवक अहिरे हे सतत पाच वर्षे गैरव्यवहार व अनियमित कामकाज करीत होते हे पंचायत विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी यांच्या निदर्शनास का आले नाही,

(३) गट विकास अधिकारी, पंचायत विस्तार अधिकारी यांनी ग्रामपंचायतीची ५ वर्षात किती वेळा तपासणी केली होती,

(४) तपासणी अहवालानुसार किती रकमेचा गैरव्यवहार झाला आहे, सदर रक्कम ग्रामसेवकाकडून वसूल करण्यात आली आहे काय,

(५) निलंबित ग्रामसेवक सध्या कामावर हजर झाला आहे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) श्री.भुपेश पांडुरंग अहिरे, ग्रामसेवक यांनी ग्रुप ग्रामपंचायत, भागाड येथे कार्यरत असतांना सन २०१०-२०११ ते सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्ष कालावधीत प्रमाणक, अंदाजपत्रक व मुल्यांकनाशिवाय खर्च करणे, दरपत्रके न मागविता साहित्य खरेदी करणे, खरेदी केलेल्या साहित्याची नोंद साठा रजिस्टरला न करणे, घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीच्या रकमा प्रत्यक्षपणे रोख वहीमध्ये व बँकेत जमा न करता रकमेचा अपहार करणे, कंपन्यांकडून करापोटी वसूल केलेल्या रकमा कॅशबुकात तसेच ग्रामपंचायत बँक खात्यात जमा न करता स्वतःच्या सहीचे स्वतंत्र खाते उघडून त्या खात्यात सदर रकमा जमा करून त्या रकमेचा अपहार करणे, आरंभीच्या शिलकेतून रक्कम कमी करणे अशा प्रकारचे आर्थिक गैरव्यवहार व नियमबाह्य कामकाज केले आहे.

(२) व (३) गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी पंचायत यांनी दिनांक १६.५.२०१२, दिनांक २९.१.२०१३, दिनांक १६.११.२०१३ व दिनांक २२.७.२०१४ रोजी ग्रामपंचायतींना भेट दिली असता संबंधित ग्रामसेवक उपलब्ध झाले नाहीत. तसेच त्यांनी दप्तर तपासणीस उपलब्ध करून दिले नाही. यास्तव प्रत्यक्ष दप्तर तपासणी होवू शकली नाही. तथापि यासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करुन गट विकास अधिकारी यांनी दिनांक ०९.०९.२०१४ रोजी तपासणी अहवाल सादर केला आहे.

(४) कायमस्वरुपी रक्कम रुपये १७,६२,५३०/- व संशयित अपहार रक्कम रुपये २६,८५,३०३/- असा एकूण रुपये ४४,८७,८३३/- इतक्या रकमेचा आर्थिक गैरव्यवहार झाला आहे. त्यापैकी रुपये १३,४५,०९१/- इतकी रक्कम श्री.भुपेश पांडुरंग अहिरे यांच्याकडून वसुल करण्यात आली आहे.
(५) नाही.

वाशिम जिल्ह्यामधील इंदिरा आवास व रमाई घरकुल योजनेचा प्रस्ताव तात्काळ निकाली काढण्याबाबत

(२०) * ७३९४ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यामधील इंदिरा आवास व रमाई घरकुल योजनेमध्ये जागेच्या संदर्भात घरकुलासाठी जागेचा प्रस्ताव तहसिल कार्यालयामध्ये गेल्या दोन वर्षापासून मंजूरीअभावी प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबित राहण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव तात्काळ निकाली काढण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील लघु जलविद्युत प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याबाबत

(२१) * ७८९२ श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लघु जलविद्युत प्रकल्पाची उभारणी संथगतीने सुरु असल्याचे माहे एप्रिल २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यातील विद्युत प्रकल्पाची कामे लवकरात लवकर पूर्ण व्हावीत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) हे खरे नाही.

राज्याच्या खाजगीकरणाच्या धोरणा अंतर्गत एकूण २४ जलविद्युत प्रकल्प कार्यान्वित झाले असून १०१ मे. वॅ. स्थापित क्षमता निर्माण झाली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यात इंदिरा आवास योजनेतील घरकुलाचे कामकाज पूर्ण करण्याबाबत

(२२) * ७००८ श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यात इंदिरा आवास योजनेतून देण्यात येणा-या घरकुल योजनेचा बोजबारा उडाला असून गेल्या वर्षात सुमारे एक हजाराहून अधिक घरकुलांची कामे आजही ठप्प असल्याचे माहे ९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपूर्णावस्थेत असलेल्या घरकुलाचे कामकाज तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील वाणगांव पासून आठ किलोमीटर परिसरातील साखरे धरण परिसरात मोठ्या प्रमाणावर दुर्मिळ पक्षांची होत असलेली शिकार

(२३) * ६७९२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वाणगांव पासून आठ किलोमीटर परिसरातील साखरे धरण परिसरात मोठ्या प्रमाणावर दुर्मिळ पक्षांची शिकार होत असल्याचे तारापूर नेचर ग्रुप या पक्षीनिरीक्षण ग्रुपने माहे मार्च २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार साखरे धरण परिसरात शिकाऱ्यांचा वाढता शिरकाव रोखण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) हे खरे नाही.

(२) शिकार होऊ नये म्हणून खालीलप्रमाणे खबरदारीच्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

क्षेत्रिय कर्मचाऱ्यांमार्फत साखरा बंधाऱ्यावर वेळोवेळी गस्त करण्यात येते.

संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तसेच सदस्य यांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अर्जुना मध्यम पाटबंधारे प्रकल्पाचे पाणी राजापूर तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांना पुरविण्याबाबत

(२४) * ६९३९ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुना मध्यम पाटबंधारे प्रकल्पाचे पाणी प्रकल्प पुर्ण होताच पाईपद्वारे राजापूर तालुक्यातील पाणी टंचाईग्रस्त गावांना पुरविण्यात आल्याने तालुक्यातील लाखो एकर जमीन सिंचनाखाली येईल असे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) अंशतः खरे आहे.

धरणाचे काम पुर्ण झाले असून संकल्पित पाणीसाठा निर्माण झाला आहे. वितरण व्यवस्थेची कामे प्रगतीत आहेत. वितरण व्यवस्था पुर्ण झालेनंतर राजापूर तालुक्यातील १४ गावातील ४३०८ हेक्टर व लांजा तालुक्यातील ५ गावातील १३९६ हेक्टर जमिनीस सिंचनाचा लाभ मिळणार आहे. मंजूर प्रकल्प अहवालात कालव्याद्वारे पाणी वितरणाची तरतुद आहे. पाईपद्वारे नाही.

(२) या प्रकल्पाकरिता सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात रु.११.२० कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे व निधीच्या उपलब्धतेनुसार वितरण व्यवस्थेची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अलिबाग (जि.रायगड) येथील बांधकाम व्यावसायिकांना बोगस नोटीसा दिल्याबाबत

(२५) * ७६९९ श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) येथील बांधकाम व्यावसायिकांना बोगस नोटीसा बजावून त्यांच्याकडून २० लाख रुपये लाच घेतल्याप्रकरणी विक्रीकर सहआयुक्त श्री.रामदास शिंदे व त्यांच्या साथीदाराला दिनांक १२ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास रायगड च्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या चौकशीत काय आढळून आले आहे व चौकशी अंती दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) होय.

श्री. रामदास पाराजी शिंदे, विक्रीकर सहआयुक्त यांनी आरोपी क्र. २ इरफान भोपाळी यांच्यामार्फत २० लाख रुपये लाचेची रक्कम स्विकारली. त्यामुळे त्यांच्याविरुध्द दिलेल्या फिर्यादीवरुन त्यांचेविरुध्द पनवेल शहर पोलीस ठाणे

कॉ.गु.र.नं. १२/२०१५ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७,८ (१३) (१) (ड) सह १३(२) सह भा.दं.वि. कलम ४६५, ४६८ ४७१, ३४ प्रमाणे दोघांविरुध्द दि. ११.०५.२०१५ रोजी ००.३० वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, वरील दोन्ही आरोपी यांना ००.३५ वा. नमूद गुन्ह्यात अटक करण्यात आली.

(२) व (३) पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग यांच्या अहवालानुसार श्री. रामदास पाराजी शिंदे, विक्रीकर सहआयुक्त यांचेवर लाच स्विकारल्याप्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम भाग - २ मधील नियम ४ (२) (अ) मधील तरतुदीनुसार श्री. शिंदे यांना अटकेच्या दिनांकपासून म्हणजेच दि. ११.०५.२०१५ पासून शासन आदेश दि. ०६/०६/२०१५ अन्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनाथ बालकांना सांभाळणाऱ्या संस्था चालकांना अनुदान अदा करण्याबाबत

(२६) * ७५४४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सुभाष झांबड, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ९५९८ ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिला व बालकल्याण विभागांतर्गत मान्यताप्राप्त खाजगी संस्थेचे ९६९ बालगृहे असून त्यात ७०,००० मुलांचे संगोपन केले जाते परंतु बालगृहातील प्रत्येक मुलासाठी मिळणारे अनुदान मिळत नसल्याने मुले, संस्थाचालक व कर्मचारी यांचेवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील अनाथ बालकांना सांभाळणाऱ्या संस्था चालकांचे गेल्या ३ वर्षापासून सुमारे १५० कोटींचे भोजन अनुदान प्रलंबित असल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात बालगृहांसाठी तरतूद केलेल्या रुपये १४ कोटी पैकी ७ कोटी १४ लाख ३६ हजार रुपये इतकाच निधी बालगृहांना वितरीत करण्यात येऊन उर्वरित रक्कम रुपये ६ लाख ८५ हजार शासनास समर्पित करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, भोजन निधीची उर्वरित रक्कम तातडीने न मिळाल्यास त्याकरिता तीव्र आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य बालविकास संस्थाचालक व कर्मचारी संघटनेने लेखी निवेदनाद्वारे शासनास माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही,

(२) अंशतः खरे आहे,

सदर प्रकरणी प्रलंबित तसेच चालू अनुदान देण्यासाठी रु.१५६,४५,११,०००/- इतक्या रकमेची पुरवणी मागणी प्रस्ताव सादर केला होता. तथापि, सदरचा प्रस्ताव निधी अभावी मान्य होऊ शकला नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे,

(५) प्रश्न उद्भवत नाही,

(६) प्रश्न उद्भवत नाही

सार्वजनिक ठिकाणी तंबाखू चघळण्यास बंदी घालण्याबाबत

(२७) * ७१८१ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक ठिकाणी तंबाखू चघळण्यास बंदी घालण्याचा निर्णय राज्यशासनाने घेतल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक ठिकाणी तंबाखू खाऊन थुंकण्यास दंड आहे मात्र त्याचा प्रभाव पडत नसल्याने तंबाखूची पिचकारी टाकणाऱ्यांना एक दिवस किंवा काही तास सार्वजनिक हिताचे काम करण्याची सक्ती करण्याचा विचार शासनाचा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(४) अद्याप कोणतीच अंमलबजावणी झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१), (२) व (३) "महाराष्ट्र आरोग्य रक्षण व थुंकी प्रतिबंध अधिनियम २०१५" राज्यात लागू करण्याचे विचाराधीन आहे. या अधिनियमांतर्गत सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्या व्यक्तीस आर्थिक दंड तसेच रुग्णालयात सामाजिक सेवा अशी तरतूद प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

लाखांदूर तालुक्यातील (जि. भंडारा) ६३ ग्रामपंचायतीच्या अंतर्गत रोहयो मजूरांची मजुरी देण्याबाबत

(२८) * ८२४२ श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखांदूर तालुक्यातील (जि. भंडारा) ६३ ग्रामपंचायतीच्या अंतर्गत मागील १ वर्षापासून तालुक्यातील ६ हजारांपेक्षा अधिक मजूरांची रोहयो मजूरी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तेथील मजूरांनी लाखांदूर गटविकास अधिकारी यांच्याकडे वारंवार मागणी करुनसुध्दा मजूरांना उर्मट उत्तरे देऊन त्यांना डावलल्याचा आरोप मजुरांनी जिल्हाधिकारी, भंडारा यांच्याकडे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, मजूरांची १ वर्षापासून प्रलंबित असलेली रोहयोची मजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे व पालघर जिल्ह्यातील अंगणवाडया तसेच आदिवासी माता व बालक यांना निकृष्ट दर्जाचे पोषण आहार पुरविल्याबाबत

(२९) * ७०६७ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यातील अंगणवाड्यांमधील हजारो बालक अजूनही दर्जेदार पोषण आहारापासून वंचित असून पुरक पोषण आहार योजनेमार्फत बालकांना दिले जाणारे कडधान्य, लापशी, खिचडी, भाज्या इ. निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच जव्हार तालुक्यात (जि.पालघर) कुपोषित बालकांचे प्रमाण कमी व्हावे म्हणून आदिवासी बालकांना व त्यांच्या मातांना जिल्हा परिषदेने खरेदी केलेले व्हिटामिन्सची पुरविण्यात आलेली बिस्कीटे मुदतबाह्य झाली असल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अन्नाची वर्षातून किमान दोनदा तरी तपासणी करावी, असे बंधन महिला बचत गटांना घालून प्रत्यक्षात अशा प्रकारची तपासणीच होत नाही तसेच जे महिला बचत गट पूरक पोषण आहार पुरवितात त्यांनी अन्न व प्रशासन विभागाचा गुमास्ता परवाना घेणेही आवश्यक आहे, परंतू ठाणे व पालघर जिल्ह्यातील केवळ ५० टक्केच महिला बचत गटांनी अशा प्रकारचे परवाने घेतले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४), गरम ताजा आहार बचतगटांकडून पुरवठा केला जात असलेल्या अन्नाची वर्षातून किमान दोनदा प्रयोगशाळेमार्फत तपासणी करुन घेणे व्यवहार्य नसल्यामुळे सदर तरतूदीमध्ये दि. ३१ ऑक्टोंबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार राज्यात कार्यरत अंगणवाडी केंद्राच्या संख्येचा प्रमाणात प्रत्येक जिल्ह्यात शासकीय प्रयोगशाळा उपलब्ध नसल्याने तसेच

गरज ताजा आहार हा काही कालावधीत नाशवंत होत असल्यामुळे त्यांची साठवणूक करण्याची सोय अंगणवाडी प्रकल्प अथवा जिल्हास्तरावर नाही. अशा परिस्थितीत प्रत्येक पुरवठा धारकाच्या गरम ताजा आहाराची वर्षातून दोन वेळा प्रयोगशाळेतून तपासणी करुन घेणे व्यवहार्य नाही.

आहाराची तपासणी करण्यासाठी अंगणवाडी परिक्षेत्रातील १० सदस्यांची माता समिती गठीत करुन आहार तपासणी करणेचे निर्देशित केलेले आहे. त्यामुळे बचतगटांची देयके माता समितीच्या अहवालाशिवाय अदा केली जात नाही. ठाणे व पालघर जिल्ह्यातील ११९७ बचत गटांनी परवाने घेतले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात महिला व बालकांच्या विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या कल्याणकारी योजना

(३०) * ८५४५ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :

सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिला व बाल विकास विभागामार्फत कुपोषणग्रस्त लहान मुले तसेच गर्भवती महिला यांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणा-या योजना, त्याचप्रमाणे वय वर्षे ११ ते १८ या वयोगटातील मुलींच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणा-या योजनांपैकी सुमारे ५० टक्के योजना चालू आर्थिक वर्षात बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कल्याणकारी योजनांपैकी कोणत्या योजना बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे व त्याची कारणे काय आहेत,

(३) महिला व बालकांच्या विकासासाठी यापूर्वी राबविण्यात येत असलेल्या योजना कार्यान्वित ठेवणे आवश्यक असल्यामुळे त्या पूर्ववत चालू ठेवण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्ह्यातील व तिवसा तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामे पूर्ण करण्याबाबत

(३१) * ८६७० श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक :

सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील व तिवसा तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत पालकमंत्री यांनी पाहणी करुन नाला खोलीकरण, पाझर तलावातील गाळ काढणे यासारखी कामे वेगाने करुन ही कामे पावसाळा पुर्वी पुर्ण करण्याचे निर्देश संबंधितांना माहे मे, २०१५ च्यादरम्यान दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील व तिवसा तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत करण्यात येणारी कामे पुर्ण करण्यात आली काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) अंशत: खरे आहे.

तिवसा तालुक्यामध्ये जिल्हास्तरीय आढावा बैठकीमध्ये मा. पालकमंत्री अमरावती यांनी सर्व यंत्रणाना पावसाळापुर्वी जास्तीत जास्त कामे पुर्ण करावे असे निदेश दिलेले आहेत.

(२) तिवसा तालुक्यामध्ये आराखडयानुसार ३७२ कामे पुर्ण करण्याचे उदिष्ट असून त्यापैकी पावसाळयापुर्वी ३३० कामे पुर्ण झाली आहेत

अमरावती जिल्ह्यामध्ये आराखडया नुसार एकुण ५६३५ कामे असून त्यापैकी पावसाळयापुर्वी ३४४१ कामे पुर्ण झाली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

निघोज (ता.पारनेर) परिसरातील डाळींबाच्या बागा वाचविण्यासाठी कुकडीचे आवर्तन सोडण्याबाबत

(३२) * ९०५९ डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :

सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निघोजसह (ता.पारनेर) परिसरात गेल्या महिन्यापासून कुकडीचे आवर्तन न सोडल्याने डाळींब बागा संकटात सापडल्या आहेत त्यामुळे उत्पन्नाचे पीक वाया जाण्याची भिती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फळपिके वाचविण्यासाठी कुकडीचे आवर्तन सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) नाही.
(२) कुकडी प्रकल्प हा आठमाही प्रकल्प असुन उन्हाळी हंगामात सिंचनासाठी पाणी देण्याची तरतूद नाही.

उन्हाळी हंगाम २०१५ साठी दि. १०.०४.२०१५ रोजी मा.राज्यमंत्री जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली व या प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील सर्व लोकप्रतिनिधी समवेत बैठक झाली या बैठकीत उपलब्ध पाण्याच्या आढावा घेण्यात आला व पिण्याचा पाण्यासाठी आवर्तन देण्याचे ठरविण्यात आले होते. त्यानुसार दि. २०/४/२०१५ ते २९/०५/२०१५ या दरम्यान आवर्तन देण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुपोषणाबाबत

(३३) * ९१५२ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७५८ कुपोषित बालके आढळून आलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुपोषणासाठी कोट्यावधी रुपये खर्च करुनही या जिल्ह्यात कुपोषित बालकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) सिंधुदुर्ग जिल्हा कुपोषण मुक्त करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये माहे मार्च, २०१५ अखेर वयानुसार वजन (SUW) या मापन निकषानुसार तीव्र कमी वजनाची ७५८ बालके होती, तर मे, २०१५ अखेर ९०६ एवढी झाली. यावरुन कुपोषणाचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते.
(३) सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.

१) ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर व स्तनदा माताना THR आहार तसेच ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील तीव्र कमी वजनाच्या बालकांना अतिरिक्त आहार दिला जातो. तसेच ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील तीव्र कमी वजनाच्या बालकांना अतिरिक्त आहार दिला जातो. ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार दिला जातो.

२) सर्व ० ते ६ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता यांची नियिमत आरोग्य तपासणी व लसीकरण आरोग्य विभागाकडून केली जाते.

३) आरोग्य विभागामार्फत ग्रामस्तरावर ग्राम बाल विकास केंद्रात सॅम श्रेणीतील बालकांना श्रेणीवर्धनासाठी दाखल करण्यात येते. आवश्यकतेनुसार बालकांना उपचार केंद्रात दाखल करुन उपचार केले जाते.

४) ग्राम बाल विकास केंद्र व बाल उपचार केंद्रात दाखल करुनही श्रेणीवर्धन न झालेल्या उंचीनुसार वजन या सॅम श्रेणीतील बालकांवर जादा उपचारांची आवश्यकता भासल्यास आरोग्य विभागामार्फत तज्ञ, नजिकच्या जिल्ह्यातील अत्याधुनिक आरोग्य सुविधा असलेल्या रुग्णालयामध्ये दाखल करुन उपचार केले जातात.

५) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत नियमित आहाराव्यतिरिक्त अतिरिक्त पौष्टिक मुल्य असलेली खाद्य पदार्थ, अंडी/केळी तसेच विविध प्रकारची आरोग्यदायी औषधे इ. चा पुरवठा अंगणवाडीतील लाभार्थींना निधीच्या उपलब्धतेनुसार केला जातो.

आदिवासी क्षेत्रातील नवसंजीवन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या प्रकल्पातील लाभार्थ्यांना अतिरिक्त पोषणमुल्य असणारा आहार पुरविण्यात येतो. अंगणवाडीतील बालकांना आरोग्य सेवा पुरविण्याकरीता आरोग्य विभागाशी योग्य तो समन्वय साधण्यात येतो.

बोडखा (जि.लातूर) येथे रोजगार हमी योजनेंतर्गत नाव नोंदणी केलेल्या मजुरांना मजुरी मिळण्याबाबत

(३४) * **९२२८ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोडखा (जि.लातूर) येथे रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर झालेली रस्त्याची व पाणंदीची तसेच वनीकरणाच्या कामासाठी नाव नोंदणी केलेल्या १४२ मजुरांपैकी ४२ मजुरांना माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहापासून मजूरीच मिळाली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार ४२ मजुरांना त्यांनी काम केलेल्या २१ दिवसांची मजुरी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य कार्यक्रमातून राष्ट्रीय आरोग्य अभियानात वर्ग करण्यात आलेले कर्मचारी अतिरिक्त झाल्याबाबत

(३५) * ९३२४ श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य कार्यक्रमातून राष्ट्रीय आरोग्य अभियानांत वर्ग करण्यात आलेल्या १०००० कर्मचाऱ्यांपैकी २५६२ कर्मचारी अतिरिक्त झाल्याचा अहवाल माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान राज्य आरोग्य संशोधन सेंटरने दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीचे संकट येऊ नये म्हणून सदर कर्मचाऱ्यांचे समायोजन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) व (२) अंशतः खरे आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मानव संसाधन सुसूत्रिकरण करण्यात आले असून संबंधित विभाग प्रमुख यांच्या समितीने कामाचे स्वरुप लक्षात घेऊन आवश्यकता नसलेली ६०० पदे कमी करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार सदर ६०० पदांपैकी २१२ रिक्त पदे रद्द करुन उर्वरीत ३८८ पदांपैकी ५४ पदांवर निवृत्त शासकीय अधिकारी नियुक्त करण्यात आले होते. त्यांच्या सेवा कमी करण्यात आल्या. उर्वरीत ३३४ पदांवरील सर्व कार्यरत कर्मचा-यांचे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान व राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत रिक्त असलेल्या पदांवर समायोजन करण्यात आले असून कोणत्याही कर्मचाऱ्यास कमी करण्यात आलेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सेवार्थ वेतन प्रणालीसाठी आवश्यक प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध नसल्याबाबत

(३६) * ९६९६ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या सर्व विभागात मागील ४ महिन्यांपासून वेतनासाठी सेवार्थ प्रणाली लागू केल्याने यापुढे सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या प्रत्येक विभागात प्रशिक्षित संगणक कर्मचारी आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध नसल्याने मागील ४ महिन्यांपासून हे काम पूर्ण झाले नसल्याने अनेक विभागातील कर्मचाऱ्यांचे वेतन थकित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, वेतन बिलाची कामे अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येत असल्याने वेतन बिलात चुका राहून वेळेवर वेतन जमा होत नसल्याच्या कर्मचाऱ्यांकडून तक्रारी येत असल्याने या प्रकरणी शासन दखल घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करणार आहे काय ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) होय.

(२) व (३) सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी सदर प्रणाली हाताळणाऱ्या आपल्या विभागातील कर्मचाऱ्यांना याबाबतचे व्यवस्थित प्रशिक्षण दिलेले आहे. तथापि ग्राम विकास विभागांतर्गत जिल्हा परिषदेतील प्रतिनियुक्तीवर असलेल्या राज्यशासकीय वर्ग-३/४ कर्मचाऱ्यांकरीता वेतन देयकासाठी अडचणी असल्याने त्यांचेकरिता हस्तालिखीत देयके सादर करावयास मान्यता दिली आहे.

नाशिक जिल्ह्यातील ८ निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास करणेबाबत

(३७) * ९८७७ डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात निसर्ग-पर्यटनाच्या दृष्टीने आठ ठिकाणच्या निसर्ग-पर्यटन स्थळांचा विकास करण्यासंबंधीचा प्रस्ताव वन विभागाकडून तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आठ निसर्ग-पर्यटन स्थळांमध्ये मालेगांवमधील गाळणा किल्ला, मार्कंडेय पर्वत, सप्तश्रृंग गड, पश्चिम भागातील पांडवलेणी, मुल्हेर किल्ला, लोणवडे उद्यान, दोधेश्वर मंदिर परिसर, साल्हेर किल्ला, वाडी पिसोळ किल्ला इत्यादी पर्यटन स्थळांचा समावेश आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय,

नाशिक जिल्ह्यातील निसर्ग पर्यटन स्थळांमध्ये पूर्व नाशिक विभागामधील मार्केडेय पर्वत, सप्तश्रृंग गड पश्चिम नाशिक विभागामधील पांडवलेणी आणि मालेगाव उप विभागामधील गाळणा किल्ला, मुल्हेर किल्ला, लोणवडे उद्यान, दोधेश्वर मंदिर परिसर, साल्हेर किल्ला, वाडी पिसोळ किल्ला इत्यादी पर्यटन स्थळांचा समावेश आहे.
(३) या पर्यटन स्थळांच्या विकास कामांच्या प्रस्तावास जिल्हा नियोजन समिती तथा जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडून मंजूरी प्राप्त करुन घेऊन, पर्यटन विकासाची कामे करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात ३७ हजार ५९ मुले रस्त्यावर वास्तव्य करत असल्याबाबत

(३८) * ९९९३ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टाटा सामाजिक संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार राज्यात ३७ हजार ५९ मुले रस्त्यावरच वास्तव्य करतात अशी महिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्याच, पाच पैकी दोन मुलांना विविध प्रकारच्या शारीरिक, मानसिक, लैंगिक अत्याचारांना सामोरे जावे लागत असून उपासमारी सहन करावी लागत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मुलांच्या मदतीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे आहे.

मुंबईतील २४ विभागातून १० विविध संघटनांच्या मदतीने रस्त्यावर राहणा-या भटकणा-या मुलांची टाटा इन्स्टिट्युट ऑफ सायन्स आणि ॲक्शन एड इंडिया यांनी पाहणी केल्याबाबतचा अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मुंबई यांचे कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्यानुसार मुंबईत ३७ हजार ५९ मुले रस्त्यावर तर ९०५ मुले रेल्वेच्या डब्यात आणि फलाटांवर आढळली असल्याचे अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

(२) अहवालात तसे नमुद केलेले आहे.

(३) शासन निर्णय दिनांक १० फेब्रुवारी, २०१४ अन्वये मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच दिनांक २ जुलै, २०१४ रोजी कृती दलाची बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत नागरी भागात राहणा-या बालकांचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेने विशेष कृती दलाची स्थापना करावी व कृती दलाच्या माध्यमातून वर नमूद बालकांचे पुनर्वसन करावे, असे ठरले. सदर बैठकीचे इतिवृत्त मुंबई महानगरपालिकेसह सर्व महानगरपालिकांना पाठविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्ह्यात मागासक्षेत्र अनुदान निधी वापराविना पडून असल्याबाबत

(३९) * **१००१० श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात मागासक्षेत्र अनुदान निधी योजनेचा मागील ५ वर्षाचा १२ कोटी रुपयांचा निधी वापराविना पडून असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(५) तसेच सदर मागास क्षेत्राचा वापराविना पडून असलेल्या निधीचा वापर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील परिचारिकांच्या विविध मागण्या

(४०) * **१०१५७ श्री.सुभाष झांबड, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती स्मिता वाघ, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १८ हजार परिचारीकांनी वेतनवाढ, विविध भत्ते, सुट्या, वेतन परिचारीकांची रिक्त पदे भरणे, जनरल नर्सिंग अँड मॅटर्निटी हा नर्सिंगचा सन २००८ मध्ये बंद केलेला अभ्यासक्रम पुन्हा सुरु करणे इत्यादी मागण्यांसाठी दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत काम बंद केले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच वेतनवाढ, रिक्त पदे आणि स्वतंत्र संचालनालय निर्माण करणे आदी परिचारिकांच्या विविध मागणीसाठी दिनांक ५ मे, २०१५ रोजी महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशनतर्फे राज्यव्यापी संप पुण्यात पुकारण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपात पुण्याच्या सरकारी रुग्णालयातील १ हजारांहून अधिक आणि राज्यातील २० हजार परिचारिकांनी सहभाग घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तीन हजार लोकसंख्येमागे एका परिचारीका तसेच एका परिचारिकेस चार ते पाच गावे देणे व त्यांची डयुटी आठ तास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) व (२) हे अंशत: खरे आहे. दिनांक ५, मे, २०१५ रोजी स. ७.३० ते ९.३० या वेळेत लाक्षणिक काम बंद आंदोलन केले होते.

(३) अंशत: खरे आहे

या लाक्षणिक कामबंद आंदोलनात पुण्यातून २७० परिचारीका आणि राज्यातील २३७९ परिचारीकांनी भाग घेतला होता.

(४), (५) व (६) शासनाच्या निकषानुसार राज्यात आरोग्य उपकेंद्रासाठी बिगर आदिवासी भागासाठी ५००० लोकसंख्या व आदिवासी भागासाठी ३००० लोकसंख्या निकष आहेत. त्यानुसार प्रत्येक एएनएमला सरासरी २-३ गावे येतात. तसेच, परिचारीकांची डयुटी शासकीय नियमानुसार आठ तास असते.

धामणशेत ग्रामपंचायती अंतर्गत (ता.मोखाडा, जि.ठाणे)
आदिवासी मजूरांना कमी मजूरी दिल्याबाबत

(४१) * १०२६६ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणशेत ग्रामपंचायती अंतर्गत (ता.मोखाडा, जि.ठाणे) २०८ आदिवासी मजूरांनी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) कामावर काम केले असता १३५ मजूरांना ठरवून दिलेल्या किमान मजूरीपेक्षा कमी मजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उधळे, हट्टीपाडा, आडोशे, बारोशी व धामणशेत या ग्रामपंचायत हद्दीतील ५०० पेक्षा जास्त मजूरांनी कामाची मागणी करुन त्यांना काम न मिळाल्याने त्यांना बेकार भत्ता (बुडीत मजूरी) मिळावा या व अन्य मागण्यांसाठी मजूरांनी दिनांक २७ मे, २०१५ रोजी तहसिलदार कार्यालयावर मोर्चा काढला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १३५ मजूरांना ठरवून दिलेल्या किमान मजूरीपेक्षा कमी मजूरी देण्याची तसेच ५०० हून अधिक मजूरांनी कामाची मागणी करुन सुध्दा त्यांना काम न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवकर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) नाही. धामणशेत ग्रामपंचायती अंतर्गत रस्त्याचे कामावरील ६९८ मजूरांपैकी १३५ मजूरांना त्यांनी केलेल्या कामाच्या प्रत्यक्ष मोजमापानुसार मजूरी प्रदान करण्यात आली आहे. महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ च्या तरतूदीनुसार मजूरांना त्यांनी केलेल्या प्रत्यक्ष कामाच्या प्रमाणातच मजूरी प्रदान करण्यात येते.

(२) व (३) अंशतः खरे आहे.

मजूरांचा बेकार भत्ता व अन्य मागण्यांसाठी श्रमजीवी संघटनेने दि.२६.०५.२०१५ रोजी तहसिल कार्यालय, मोखाडा येथे मोर्चा काढला होता. प्रश्नाधीन गावापैकी-

१) मौजे, उधळे, हट्टीपाडा येथे मजूरांना काम उपलब्ध करुन देण्यात आले होते. तथापि, खडी फोडणे व माती टाकणे या कामांवर मजूर काम करण्यास तयार नसल्याने मजूर कामावर आले नाहीत. त्यामुळे त्यांना बेकार भत्ता अनुज्ञेय नाही.

२) मौ.बोटोशी ग्रामपंचायती अंतर्गत ३६८ मजूरांपैकी १९५ मजूरांना ग्रामपंचयातीमार्फत काम उपलब्ध करुन देण्यात आले आहे व उर्वरित १७३ मजूरांनी बेकार भत्याची मागणी केली आहे. मात्र याकरिता विहित नमुन्यातील अर्ज व इतर कागदपत्रे मजूरांनी दिलेली नसल्यामुळे बेकार भत्ता देण्याची प्रक्रिया करण्यात आलेली नाही.

३) मौ. धामणशेत व मौ.आडोशे येथील कामाची मागणी केलेल्या मजूरांना काम उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाबाबत

(४२) * १०३३८ श्री.प्रकाश गजभिये, श्री.सुनिल तटकरे : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नदीजोड प्रकल्पांतर्गत विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला राष्ट्रीय जलविकास प्राधिकरणाने प्रकल्पाचे काम हाती घेण्यास संमती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नदी जोड प्रकल्पामुळे गोसीखुर्द प्रकल्पातील वाहून जाणारे १९०० दशलक्ष घन मीटर पाणी विदर्भातील अन्य जिल्ह्यात वळविण्यात येणार असून त्याबाबतचा अहवाल तयार करण्याचे निर्देश विदर्भ पाटबंधारे मंडळाच्या जलविज्ञान विभागाच्या मुख्य अभियंता यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे तसेच या प्रकल्पासाठी किती खर्च अपेक्षित आहे ?

श्री. गिरीष महाजन : (१), (२) व (३) गोसीखुर्द प्रकल्पस्थळी उपलब्ध असलेले अतिरिक्त पाणी वैनगंगा-नळगंगा नदीजोड योजनेद्वारे विदर्भातील तुटीच्या भागात वळविण्याचे प्रस्तावित आहे. याबाबत राष्ट्रीय जलविकास अभिकरण यांनी तयार केलेल्या पूर्व अर्हता प्रकल्प अहवालानुसार प्रकल्प व्यवहार्य आहे. याकरीता राज्य शासनाने दि.०६.०४.२०१५ चे पत्रान्वये राष्ट्रीय जलविकास अभिकरणास सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची विनंती केली असून सदर अभिकरणामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेचे काम प्रगतीत आहे.

खेड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) विविध गावातील ३४ आरोग्य उपकेंद्रामध्ये प्रसूतिगृह नसल्याबाबत

(४३) * ९४९६ श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयंत पाटील : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यातील (जि.रत्नागिरी) विविध गावातील ३४ आरोग्य उपकेंद्रामध्ये प्रसूतिगृहच नसल्याचे दिनांक ११ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन प्रसुतिगृह व इतर पायाभूत सुविधा नसल्याने तेथील ग्रामीण भागातील महिलांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खेड तालुक्यातील ३४ आरोग्य केंद्रात प्रसूतिगृहाची उभारणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशतः खरे आहे. खेड तालुक्यात (जि.रत्नागिरी) येथे २३ उपकेंद्रांमध्ये प्रसुतीगृह इमारती नाहीत.

(२) हे खरे नाही. प्रसुतीगृह उपलब्ध नसलेल्या ग्रामीण भागातील महिलांना प्रसुतीगृह उपलब्ध असलेल्या उपकेंद्रामध्ये व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पाठवून संस्थांमध्ये प्रसुती केल्या जातात.

(३) २० उपकेंद्रांसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित ग्राम पंचायतीच्या सरपंचाना जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे मार्फत कळविण्यात आले आहे. उर्वरित ३ उपकेंद्रासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने सदर उपकेंद्र इतर गावात स्थलांतरीत करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यात ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या बीआरजीएफ योजनेबाबत

(४४) * ७८७७ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या बीआरजीएफ योजनेचा दुसरा हप्ता माहे एप्रिल, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहापर्यंत मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर योजना पूर्णक्षमतेने चालावी म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय.

(२) होय.

(३) मागास क्षेत्र अनुदान निधी (बीआरजीएफ) ही योजना १००% केंद्र पुरस्कृत योजना असून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनाकडून दिनांक २० एप्रिल, २०१५ नंतर अनुदान प्राप्त होणार नसल्याने सदरील योजना बंद करण्याचे ठरविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथील जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय प्रतिपुर्ती देयके व अपंग प्रमाणपत्रामध्ये झालेला गैरव्यवहार

(४५) * ८०३२ श्री.जयवंतराव जाधव, श्री.संदिप बाजोरिया, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव व येवला (जि.नाशिक) तालुक्यातील आरोग्य संस्थांची सी.एस.आर. योजनेमधून सुधारणा करण्यासाठी मनमाड येथील पेट्रोलियम कंपन्यांना प्रस्ताव पाठविण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक दिनांक २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी निर्णय होवूनही जिल्हा शल्यचिकित्सकांनी प्रस्ताव पाठविण्याबाबत दिरंगाई केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ जानेवारी, २०१५ व दिनांक ४ मे, २०१५ रोजी जिल्हा शल्यचिकित्सकांकडे स्मरणपत्राद्वारे पाठपुरावा करुनही त्यांनी लोकप्रतिनिधींच्या निवेदनांची दखल घेतलेली नाही, हेही खरे आहे काय,

(३) तसेच नाशिक येथील जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय प्रतिपुर्ती देयके व अपंग प्रमाणपत्रांमध्ये मोठे गैरव्यवहार असल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नाशिक येथील आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभुमीवर अशा कार्यक्षम व बेपर्वाई करणा-या अधिका-यांची बदली करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) या व इतर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येत असून सिंहस्थ कुंभमेळयानंतर आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

उभळे ग्रामपंचायतीमध्ये (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) ग्रामसेवकाने केलेला गैरव्यवहार

(४६) * ७२१३ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.रामराव वडकुते : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उभळे ग्रामपंचायतीमध्ये (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) ग्रामसेवक राजेंद्र पवार याने १४ लाखांचा गैरव्यवहार केल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामसेवकाने आता नांदगाव खुर्द ग्रामपंचायत मध्येही लाखोचा गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषी ग्रामसेवकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) उभळे ग्रामपंचायतीच्या सन २००७-०८ ते २००९-१० या आर्थिक वर्षाच्या लेखा परिक्षणाच्या अनुषंगाने तसेच सन २०१०-११ ते २०१२-१३ या कालावधीतील दप्तर तपासणीमध्ये रु. १०,१८,५९०/- एवढया किंमतीचा गैरव्यवहार झाल्याचे दिसून आले असून या कालावधीत श्री.जितेंद्र बबन पवार हे ग्रामसेवक कार्यरत होते.

(२) नांदगाव खुर्द ग्रामपंचायत तेथे सन २०१४-१५ मध्ये रु. ८,७९,३६१ एवढया रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) होय.

(४) कार्यरत ग्रामसेवक यांना दि. २४ जून, २०१५ पासून जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ऑनलाईन लॉटरी चालविणाऱ्या कंपन्यांनी कर बुडविल्याबाबत

(४७) * ६६७८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात ऑनलाईन लॉटरी चालविणाऱ्या राज्यातील कंपन्यांनी राज्य सरकारचा सुमारे २ लाख २५ हजार कोटी रुपयांचा कर बुडविल्याची घटना दि. २२ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात वेगवेगळया नावाने कंपन्या स्थापन करणाऱ्या काही मालक, संचालक यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कंपनी मालक/संचालक यांचेशी लॉटरी संचालनालयातील अधिकाऱ्यांचे हितसंबंध आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आजपर्यंत या अधिकाऱ्यांनी त्यांना केवळ नोटीस दिल्या आहेत, पुढील काहीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे का वा करण्यात येत आहे काय,

(६) असल्यास, संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) ते (७) अशी बाब नाही, तथापि, उच्च न्यायालयात लॉटरी कर प्रवर्तकांनी महाराष्ट्र लॉटरी कर अधिनियम, २००६ विरोधात याचिका दाखल केल्या होत्या, त्यावेळी लॉटरी कर अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी लॉटरी प्रवर्तकांना कठोर कारवाई न करण्याचे आदेश मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिले. सदर आदेशाचा फायदा घेऊन इतर राज्यांच्या लॉटरी प्रवर्तकांनर लॉटरी कर शासनाकडे जमा करणे थांबविले व त्यावर शासनास कारवाई करणे शक्य झाले नाही. त्या याचिकांवरील निर्णयात प्रस्तुत अधिनियम योग्य असल्याचा उच्च न्यायालयाने सन २००९ मध्ये निर्णय दिला. न्यायालयाच्या निर्णयानंतर नियमितपणे आगाऊ लॉटरी कर वसूल करण्यात येत आहे. तथापि, सन २००७-२००९ दरम्यान न्यायालयाच्या स्थगिती आदेशामुळे एकूण रु.९३३.१४ कोटी इतका लॉटरी कर लॉटरी प्रवर्तक कंपन्यांकडे थकीत असल्याचे प्राप्त माहितीच्या आधारे निश्चित केला आहे. तथापि, सदर कराची रक्कम लॉटरी प्रवर्तक कंपन्यांनी शासनाकडे भरणा न केल्याने याबाबत महाराष्ट्र लॉटऱ्यांवरील कर अधिनियम, २००६ मधील कलम १८ नुसार जमीन महसुलाच्या थकबाकी प्रमाणे वसुली करण्याकरिता संबंधीत जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आलेले होते. तथापि, थकबाकीदार प्रवर्तक कंपन्या त्यांनी दिलेल्या पत्यावर आढळून येत नाही असे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे. आता पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्यातील धरणांच्या सुरक्षिततेबाबत

(४८) * ७१२४ श्री.माणिकराव ठाकरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४०० धरणांच्या सुरक्षिततेबाबत अनियमितता आणि गंभीर उणिवा असल्याचे डॅम सेफ्टी ऑर्गनायझेशन या शासकीय संस्थेने केलेल्या तपासणीत माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणांच्या सुरक्षिततेबाबत उणिवा राहिल्यास भविष्यात मोठी हानी होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) संदर्भात शासनाने चौकशी केली आहे,
(४) असल्यास, चौकशी दरम्यान काय निष्पन्न झाले, त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) राज्यातील सर्व मोठ्या धरणांची तपासणी क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत होत असते. धरण सुरक्षितता संघटना, नाशिक कडून काही निवडक धरणांची चाचणी तपासणी केली जाते. सन २०१३ च्या धरण स्थिती अहवालाप्रमाणे एकूण १२२६ मोठ्या धरणांपैकी (वर्ग १ व वर्ग २) ४०० धरणांवर संवर्ग २ त्रुटी आढळल्या आहेत. संवर्ग २ त्रुटी म्हणजे दुरूस्त करण्याजोग्या त्रुटी ज्यांकडे त्वरीत लक्ष देणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत कोणत्याही धरणांना गंभीर धोका निर्माण झालेला नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्ह्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत रस्ते व पूलाचे बांधकामाची देयके अदा करण्याबाबत

(४९) * ७४१६ श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात प्रधान मंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत रस्ते व पूलाचे बांधकाम सन २०१४-२०१५ या वर्षी घेण्यात येवून त्याकरीता १०,९६१.७३ लक्ष रुपये मंजुर करण्यात येवून काम प्रगती पथावर असून सदर कामाचे कंत्राटदारांचे ११२३.१७ लक्ष रुपये देयके प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रलंबित देयके उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) व (२) चंद्रपूर जिल्ह्याकरीता सन २०१४-२०१५ मध्ये रु. १०,९६१,७३ लक्ष किंमतीचा कार्यक्रम मंजूर करण्यात आलेला आहे. सन २०१५-१६ या वर्षात माहे जून, २०१५ अखेरपर्यंत चंद्रपूर जिल्ह्याकरीता रु. १९४.९५ लक्ष इतका निधी देण्यात आलेला आहे. केंद्र शासनाकडून आवश्यक इतका निधी प्राप्त न झाल्यामुळे राज्यातील बहुसंख्य कामांची देयके प्रलंबित आहेत. केंद्र शासनाकडून आवश्यक इतका निधी प्राप्त करुन घेण्याकरिता शासन स्तरावरुन निधी मागणी बाबत सतत पाठपूरावा चालू आहे. तसेच विविध बैठकांमध्ये केंद्र शासनाकडे याबाबत मागणी करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे आरणगाव, ता.केज येथे रोजगार हमी योजनेंतर्गत रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

(५०) * ७४९० श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात केज तालुक्यातील आरणगाव ते कोठावळे वस्ती तसेच आरणगाव ते गितेवस्ती या रस्त्यांची कामे न करता बनावट कागदपत्रे तयार करुन रोजगार हमी योजनेत ४३.२७ लक्ष रुपयांचा शाखा अभियंता, सरपंच, ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याचे दिनांक १७ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच रोहयो अंतर्गत रस्त्याची कामे न करता बोगस मजूरांची नावे लावून बनावट स्वाक्षऱ्यांच्या आधारे कामाची देयके उचलल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसिलदार व मा.पालकमंत्री यांना या प्रकरणी उच्च स्तरीय चौकशी करण्याबाबत निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) अंशतः खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत-

अ) आरणगाव ते कोठावळे वस्ती (ता.केज, जि.बीड) या रस्त्याला प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे, मात्र या कामास कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नाहीत.

ब) आरणगाव ते गितेवस्ती हे काम मग्रारोहयो मधून पूर्ण केले असून या रस्त्याच्या कामावरील मजुरांची कामाची मागणी व हजेरीपत्रकावर दर्शविलेले मजूर यामध्ये तफावत आढळून आली आहे. तसेच रस्त्याचे कमी लांबीचे काम केले असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर कामावर गैरव्यवहार आढळून आला आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांनी चौकशी केली असून चौकशीमध्ये रस्त्याच्या कामाची लांबी कमी असणे, मजुरांची कामाची मागणी व हजेरीपत्रकावरील मजुरांची नावे यामध्ये तफावत असणे, काम न करताच मजुरांनी मजुरीची रक्कम उचलणे इत्यादी बाबी आढळून आल्या आहेत.

या अनियमिततेस जबाबदार असलेले अधिकारी/कर्मचारी यांचे विरुद्ध विभागीय चौकशीची कारवाई प्रस्तावित असून चौकशीत दोषी आढळल्यास त्यांचे विरुद्ध नियमानुसार उचित कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अवैध गर्भलिंग चाचणी करणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत

(५१) * ८३५३ श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जन्माआधी गर्भलिंग चाचणी करणे हा कायद्याने गुन्हा असतानाही काही ठिकाणी अवैधरित्या गर्भलिंग चाचण्या करुन डॉक्टर गैरव्यवहार करीत असल्याचे माहे एप्रिल-२००५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्त्रीभ्रुणहत्या रोखण्यासाठी सातत्याने जनजागृती करुनही सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये मुलींच्या जन्मदराचे प्रमाण वाढले नसल्याचे माहे एप्रिल-२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात एक हजार मुलांमागे ९५० मुली तर मुंबईमध्ये हेच प्रमाण एक हजार मुलांमागे ९३० मुली इतके जन्मदर प्रमाण असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार या अवैध गर्भलिंग चाचणी करणा-या तसेच राज्यात मुलींच्या जन्मदरात घट होणे ही चितेंचे बाब असून मुलींच्या जन्मदराची घट रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि राज्यात मुलीचे प्रमाण वाढविण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

राज्यात मुलीचे प्रमाण वाढविण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत २००९ समुचित प्राधिकाऱ्याचर नियुक्ती (जिल्हाधिकारी), जिल्हा शल्यचिकित्सक, आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिक्षक, अप्पर जिल्हाधिकारी, तहसिलदार इ. करण्यात आलेले असून त्यांना कायद्याचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे सदर कायद्याच्या कलम १६ (अ) नुसार मा. आरोग्य कुटुंब कल्याण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली २५ सदस्यांचा समावेश असलेल्या राज्यपर्यवेक्षकीय मंडळाची पुर्नस्थापना करण्यात आलेली आहे.

राज्यसमुचित प्राधिकाऱ्यास सल्ला आणि मदत करण्यासाठी राज्यसल्लागार समिती स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

- या व्यतिरिक्त सोनोग्राफी केंद्रांची तीमाही तपासणी सोनोग्राफी व गर्भपात केंद्राची धडकमोहिम तपासणी समुचित प्राधिकाऱ्यांकडून पार पाडली जाते.
- पीसीपीएनडीटी कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी व लिंग निवडीस प्रतिबंध करण्यासाठी मेळावे, सभा, पथनाटय, कार्यशाळा, रॅली या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.
- पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता पथकाची स्थापना करण्यात आलेली असून दरमहा होणाऱ्या बैठकीद्वारे कार्याचा आढावा घेण्यात येतो.
- पीसीपीएनडीटी कायद्याचा भंग करणाऱ्यांविरुध्द केसेस दाखल करण्यात आलेल्या असून काही प्रकरणांमध्ये दोषी व्यक्तींना सश्रम कारावास तसेच दंड यासारख्या शिक्षा देण्यात आल्या आहेत.
- पीसीपीएनडीटी कायद्याच्या अंमलबजावणीकरिता पुरक योजना तयार करण्यात

आली असून त्याकरिता रु. १२३.९६ लक्ष एवढी तरतुद करण्यात आली आहे.

- मुलींच्या जन्माला उत्तेजन देण्यासाठी राज्यात शासनामार्फत सावित्रिबाई फुले कन्या कल्याण योजना राबविण्यात येते.
- सर्व सामान्य लोकांना तक्रार नोंदविण्यासाठी www.amchimulgi.gov.in ही वेबसाईट तयार करण्यात आली असून त्यावर प्राप्त होणाऱ्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यात येते. सदर संकेतस्थळावर तक्रारीचा पाठपुरावा करण्याची सुविधा उपलब्ध आहे. पीसीपीएनडीटी कायद्यासंदर्भात हेल्पलाईन कक्षाची स्थापना करण्यात आली असून सर्व सामान्य लोकांना तक्रार नोंदविण्यासाठी एक टोल फ्री नंबर देण्यात आलेला आहे.
- सोनोग्राफी आणि इमेजिंग मशीन निर्मिती वितरक यांना राज्य समुचित प्राधिकाऱ्यांकडे नोंदणी करणे बंधनकारक केले आहे. तसेच राज्य समुचित प्राधिका-यांकडे नोंदणी असलेल्या व्यावसायीकांकडूनच सोनोग्राफी मशीन खरेदी करणे बंधनकारक केलेले आहे. उपरोक्त प्रमाणे सुचना सील केलेल्या सोनोग्राफी केंद्राच्या दर्शनीभागावर प्रदर्शीत करणे बंधनकारक केलेले आहे. उपरोक्त प्रमाणे सुचना सील केलेल्या सोनोग्राफी केंद्राच्या दर्शनीभागावर प्रदर्शीत करणे बंधनकारक केलेले आहे.

सर्व सोनोग्राफी केंद्रांना ऑनलाईन फॉर्म भरणे बंधनकारक करण्यात आले असून, माहे जुन, २०१५ अखेर एकूण ६८२६ इतकी ऑनलाईन नोंदणीकृत सोनोग्राफी केंद्रे आहेत. तसेच ऑनलाईन ए आणि एफ फॉर्म साठी http://pcpndt.maharashtra.gov.in ही वेबसाईट सुरु करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मजगाव (ता.मुरुड, जि.रायगड) गावठाणालगत वन विभागाच्या हद्दीत अनधिकृतपणे बांधकाम केल्याबाबत

(५२) * **६६९८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मजगाव (ता.मुरुड, जि.रायगड) येथील गावठाणालगत असलेल्या वन विभागाच्या जागेत अनधिकृत बांधकाम करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) मुरुड वनक्षेत्रातील मुरुड वन परिमंडळातील विहुर नियतक्षेत्रामध्ये मौजे मजगांव येथील गट क्रमांक ५९९ (जुना सर्व्हे क्रमांक ११४) मध्ये महाराष्ट्र शासन संपादित वन ११.९४ हे.आर असून श्री.शंकर बाळु दिवेकर यांचे पुर्नस्थापित क्षेत्र ०.६१ हे. व गावठाणचे क्षेत्र ०.१९ हेक्टर आहे. मौजे मजगांव गांवठाण्यालगत संपादित वनक्षेत्रात माहे ऑक्टोबर, २०१४ च्या दरम्यान २ अतिक्रमकांनी ०.०१४० हे. क्षेत्रावर घराचे अतिक्रमण केले आहे.

(२) माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये निदर्शनास आलेल्या गट क्रमांक ५९९ (जुना सर्व्हे क्रमांक ११४) मौजे मजगांव मध्ये वनजमिनीवर बांधकाम करुन अतिक्रमण करणारे व्यक्ती यांचेवर भारतीय वन अधिनियम, १९२७ तसेच वन (संवर्धन) अधिनियम, १९८० मधील कलम २ अन्वये अनुक्रमे श्री.विठु नथु पवार व श्री.दीनानाथ काशीनाथ कोंडाणी, रा.मजगांव यांचेवर गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय महामार्गावरील अकोला-पातूर रोडवर केलेली वृक्षतोड

(५३) * ७४०५ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्गावरील अकोला-पातूर रोडवर (ब्रिटीशकालीन) झाडांना रात्री आग लावून नंतर वृक्षांची तोड करण्यात येत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही वेळा वृक्ष रस्त्यावर कोलमडल्याने महामार्गावरील वाहतूक प्रभावित होत असून महामार्गावरील वृक्षांचे संवर्धन व सुरक्षेच्या जबाबदारीबाबत नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडिया, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वन विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सर्रासपणे वृक्षतोड करण्यास जबाबदार असणा-या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) हे खरे नाही,

(२) हे खरे नाही,

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्या यांना १४ व्या वित्त आयोगानुसार निधीची तरतूद करण्याबाबत

(५४) * ९३०२ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने १४ व्या वित्त आयोगात जिल्हा परिषद, पंचायत समित्या यांना काहीच निधी न देता ग्रामपंचायतीना १०० टक्के देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्या यांना १४ व्या वित्त आयोगात तरतूद करण्यात यावी म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) १४ व्या वित्त आयोगाने त्यांच्या अहवालामध्ये केवळ ग्रामपंचायत स्तरासाठी राज्याला अनुदान देण्याची शिफारस करण्यात केली आहे. १४ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या अहवालाच्या शिफाशींच्या अनुषंगाने केंद्रिय वित्त मंत्रालय ह्यांच्याकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना अद्याप प्राप्त व्हावयाच्या आहेत.

(२) केंद्रिय वित्त आयोगाचे अनुदान प्राप्त होण्यासाठी केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करणे आवश्यक असल्याने त्यानुसार राज्य शासनाकडून अंमलबलावणी केली जाते. अद्यापही केंद्र शासनाकडून या सुचना प्राप्त झालेल्या नसल्याने त्याअनुषंगाने यासंदर्भात कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

माळशिरस तालुक्यातील निमगाव परिसरात निरा उजवा कालवा विभागाने पाण्याचे पूर्वनियोजन न करता पाणी सोडल्याने शेतकऱ्यांच्या शेतीचे झालेले नुकसान

(५५) * ८७०१ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस तालुक्यातील निमगाव परिसरात निरा उजवा कालवा विभागाने उन्हाळा हंगामातील पाण्याची पाळी सोडताना पूर्वनियोजनाची अंमलबजावणी न केल्यामुळे शेतकऱ्यांची पिके जळाल्यानंतर पाणी सोडण्यात आल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्याचे पूर्वनियोजन न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील सूर्या धरणाचे पाणी वाणगांव पश्चिमेला नेण्याबाबत

(५६) * ६८०७ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील सूर्या धरणाचे पाणी पाईप लाईनद्वारे पूर्वेकडून पश्चिमेला (वाणगांव पश्चिमेला) नेण्याचे काम गेली अनेक वर्षे अपूर्ण स्थितीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामासाठी पश्चिम रेल्वे खालून पाईपद्वारे पाणी नेणे आवश्यक असल्यामुळे व त्याकामी रेल्वेची मंजूरी व निधीची उपलब्धता न झाल्यामुळे कामास विलंब झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचा प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे?

श्री. गिरीष महाजन : (१) होय.
(२) होय.
(३) प्रकल्पावर प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्च झाला आहे. त्यामुळे पुढील सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाल्यावर निधीच्या उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

बिरवाडी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील सिंचन योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत

(५७) * ७५६१ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ४९८११ ला दिनांक २ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००५ मध्ये शहापूर तालुक्यातील भातसा धरण परिसरातील बिरवाडी सिंचन योजनेकरिता रुपये ८ कोटीच्या रकमेस शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रशासकीय मान्यतेनतंर सदर योजना सन २००९ मध्ये पुर्ण होणे अपेक्षित असताना सदर योजना ६ वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील अद्याप पुर्ण झाली नसल्याचे तसेच या योजनेकरिता खर्च ८ कोटी रुपये वरुन रुपये १९ कोटी ५६ लाख पर्यंत गेला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, योजना पूर्ण झालेली नसतानाही या योजनेवर मोठया प्रमाणावर झालेल्या खर्च प्रकरणी चौकशी करण्याबाबत तसेच सदर सिंचन योजना तातडीने पूर्ण करण्याबाबतची मागणी स्थानिक ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींनी संबंधित कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, ठाणे, मा. जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य व सचिव, जलसंपदा विभाग यांचेकडे केली आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बिरवाडी सिंचन योजना पूर्ण होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) होय.

(२) होय.

जून, २०१४ मध्ये शासनाने रुपये १९.५६ इतक्या रक्कमेस सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(३) अंशतः खरे आहे.

योजना पूर्ण करण्याबाबत लोकप्रितिनिधींनी कार्यकारी अभियंता यांचेकडे मागणी केली आहे.

(४) उपसा सिंचन योजनेच्या पंपगृहातील पंप बसविण्याचे व विद्युत संचाची उभारणी (Switch yard) चे काम चालू आहे. पंपगृहापासून पहिल्या वितरण कुंडापर्यंतच्या पाईप लाईनचे व वितरण व्यवस्थेचे काम जवळपास पूर्ण झालेले आहे. उर्वरित ठिकाणची कामे प्रगतीपथावर असून डिसेंबर २०१६ पर्यंत योजना पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या विष्णुपुरी तसेच मानार प्रकल्पात अत्यल्प पाणीसाठा शिल्लक राहिल्याबाबत

(५८) * ७०७८ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्पात केवळ १५.२० टक्के तसेच जिल्हयातील मानार प्रकल्पात ५.६५ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने पाणीटंचाईचे तीव्र संकट निर्माण झाले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे उपलब्ध पाणीसाठयाचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) हे खरे नाही,

(२) प्रश्न उद्भवत नाही. पाणी टंचाई तीव्र होऊ नये म्हणून पूर्णा प्रकल्पातून २८.०० द.ल.घ.मी. पाणीसाठा घेण्याचे नियोजन करण्यात आले होते. तथापि, प्रकल्पाच्या स्थानिक परिसरामध्ये झालेल्या पर्जन्यमानामुळे जलसाठ्यात वाढ झाल्याने पूर्णा प्रकल्पातून पाणी सोडण्याची आवश्यकता भासली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात स्वाईन फ्ल्यूच्या रुग्णांना खर्चाचा परतावा मिळण्याबाबत

(५९) * ८५४९ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वाईन फ्ल्यू झालेल्या अनेक रुग्णांना महापालिका किंवा शासकीय रुग्णालयात व्यवस्था पुरेशी नसल्यामुळे खाजगी रुग्णालयात जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णांना त्याचा खर्च देण्याची घोषणा शासनाने केली असून रुग्णांची यादीच तयार झालेली नसल्यामुळे स्वाईन फ्ल्यूच्या रुग्णांना आर्थिक परतावा मिळाला नसल्याचे दिनांक १६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, स्वाईन फ्ल्यूच्या रुग्णांना खर्चाचा परतावा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे नाही.

स्वाईन फ्ल्यू रुग्णांच्या उपचाराची सुविधा राज्यातील १०० खाटांच्या सर्व उपजिल्हा रुग्णालयात तसेच जिल्हा रुग्णालयात करुन देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे वैद्यकिय महाविद्यालयांना जोडलेल्या रुग्णालयांमध्ये आणि महानगरपालिकांच्या अधिनस्त असणाऱ्या निवडक रुग्णांलयांमध्ये देखिल ही सुविधा उपलब्ध आहे.

(२) व (३) हे अंखत: खरे आहे.

स्वाईन फ्ल्यू आजारावर खाजगी रुग्णालयात गंभीर स्थितीत जीवनावश्यक प्रणालीवर उपचार घेणाऱ्या गरीब व आर्थिकदृष्टया दुर्बल रुग्णांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यास अनुसरुन राज्यात एकूण १८५ रुग्णांचे वैद्यकिय प्रतिपुर्तीसाठीचे अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी छाननी करुन ११९ देयके जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आलेली आहेत. सदर देयके पारीत करुन संबंधितांना आर्थिक परतावा देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात देहदान करण्यासाठी जनजागृती करण्याबाबत

(६०) * **८६७२ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात यावर्षी देहदान १९ जणांनी केल्याचे निदर्शनास आल्याने अवयवदानासाठी देहदान करण्यासाठी मुंबई पिछाडीवर असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी मुत्रपिंड व यकृत रोपणासाठी नावे नोंदवल्यांची प्रतीक्षा यादीत वाढत असून प्रतीक्षा यादीच्या वाढीच्या तुलनेत अवयवदानासाठी येणारा वेग अतिशय कमी असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने देहदान करण्यासाठी जनजागृती करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) नाही. ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई येथे सन २०१४ मध्ये ५४ आणि सन २०१५ मध्ये आतपर्यंत २८ मृतदेह देहदानांतर्गत प्राप्त झाले आहेत.

(२) होय.

(३) सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये प्राध्यापक, शरीररचनाशास्त्र, वैद्यकीय अधिक्षक व स्थानिक पातळीवर दोन सामाजिक कार्यकर्ते यांची देहदान समिती कार्यरत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

दमणगंगा-पिंजाळ, पार-तापी, नर्मदा या प्रकल्पांना
राष्ट्रीय प्रकल्प घोषित करण्याबाबत

(६१) * ९९०६ डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दमणगंगा-पिंजाळ, पार-तापी, नर्मदा या प्रकल्पांना राष्ट्रीय प्रकल्प घोषित करण्याची मागणी नवी दिल्ली येथे दिनांक १५ मे, २०१५ रोजी केंद्रीय जलसंधारण, मंत्रालयाने विज्ञान भवनात आयोजित बैठकीत महाराष्ट्र शासनातर्फे करण्यात आली हे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्याचा संतुलित वापर व्हावा तसेच टंचाईग्रस्त भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई दुर व्हावी, यास्तव या प्रकल्पातील उर्वरित पाणी उपसा सिंचनाद्वारे अनुक्रमे गोदावरी व तापी खोऱ्यात वळवून अवर्षणग्रस्त भागात पाणी उपलब्ध करुन देण्याची मागणी यावेळी करण्यात आली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, नदीजोड योजनेंतर्गत राष्ट्रीय प्रकल्पांचे निकष ठरवितांना केवळ सिंचन क्षेत्र हे एकमेव निकष न ठेवता लोकसंख्या, भुजल फेरसर्वेक्षण भागातील अवर्षणाची तिव्रता व अन्य बाबींचाही विचार व्हावा, अशीही मागणी करण्यात आली आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) होय.

(२), (३) व (४) होय.

अ) नार-पार-तापी-नर्मदा खोऱ्यातील सर्वसाधारणपणे २०० मी. उपसा उंचीच्या टप्प्यातील पाणी वळविणे बरोबरच या तलांकाखालील जादाचे पाणी बोगद्याद्वारे तापी व गोदावरी खोऱ्यातील तुटीच्या भागात वळविण्याचा अभ्यास. राष्ट्रीय जलविकास अभिकरणाकडे करण्याचीही विनंती करणेत आली.

ब) राष्ट्रीय प्रकल्पासाठी राष्ट्रीय जलविकास अभिकरणाने किमान २ लक्ष हेक्टर लाभाक्षेत्राचे प्रकल्प हा एकमेव निकष न ठेवता, मुंबई सारख्या महानगरांना पिण्याच्या पाण्याच्या योजना, महाकाय भू-जल पुन:भरण योजना इत्यादींचा देखील विचार करावा, अशीही विनंती सदर बैठकी दरम्यान करण्यात आली.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वसमत तालुक्यातील जंगलात वन विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने होणारी वृक्षतोड

(६२) * **१००२२ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत तालुक्यातील औंढापूर्व रेंज अंतर्गत कोठारी सुकळी, सुकळी, पार्डी, शिरुड, सेंदूरसना, चोंडी वाई, बोल्डा, कुरुंदा, वापटी, कुपटी, पांगरा शिंदे, मरसुळ आदि भागातील जंगलात वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी वनपाल वनरक्षक यांच्या संगनमताने मोठया प्रमाणात जंगलतोड व लाकडाची बेकायदेशीर वाहतुक होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) हे खरे नाही.

तथापि, नियमित तपासणी कामामध्ये मौजे-सुकळी, मौजे-सेंदूरसेना, मौजे-मरसूल व मौजे-सिरली अशा एकूण ४ गावामध्ये एकूण ५ सागी थूट व गैरी ६३ थूट आढळून आले. (नुकसानी किंमत रुपये ७३२१/-) सदरच्या चोरट्या तूटीबाबत अज्ञात आरोपीविरुद्ध ४ वनगुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

(२) चोरट्या तूटीबाबत या प्रकरणी चौकशी पूर्ण करण्यात आली. अज्ञात आरोपी आढळून आले नाही. त्याबाबत वनपाल व वनरक्षक यांना सक्त ताकीद देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सरळगांव (ता.मुरबाड, जि.ठाणे) ग्रामपंचायतीने सर्व्हे नं. ३४

या जागेवर अनधिकृतपणे उभे केलेले व्यापारी संकुल

(६३) * **१०३५१ श्री.प्रकाश गजभिये, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरळगांव (ता.मुरबाड, जि.ठाणे) ग्रामपंचायतीने सर्व्हे नं. ३४ या जागेवर अनधिकृतपणे व्यापारी संकुल उभे करुन त्यातील गाळे लिलावापूर्वीच विक्री केल्याचे दिनांक ७ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंदाजे ५ कोटी रुपये बांधकाम खर्च असलेल्या या ७७ गाळांच्या व्यापारी संकुलाची निविदा न काढताच बांधकाम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या व्यापारी संकुलाचे बांधकामासाठी जी बिगरशेती परवानगी वापरली आहे ती बिगरशेती परवानगी सन १९७९ या सालातील असून तीची मुदत संपलेली असतानाही ग्रामपंचायतीने बांधकामास परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या १५० चौ.फुटाच्या गाळयाची किंमत बांधकाम विकास दरानुसार जास्तीत जास्त अडीच लाख रुपये असताना सरपंच, उपसरपंच व ग्रामसेविका यांनी १० ते ११ लाख रुपये प्रमाणे अनामत रक्कम घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जमा केलेली रक्कम ग्राम निधीच्या खात्यावर जमा न करता ती अन्य खात्यावर जमा करुन ग्रामपंचायतीला फायदा होण्याऐवजी सरपंच, उपसरपंच व ग्रामसेविका यांनाच आर्थिक फायदा झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) नाही.

ग्रापंचायत सरळगांव, ता. मुरबाड यांनी याप्रकरणी रितसर प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी घेऊन लोक वर्गणी व अनामत रकमेतून (लोकसहभागाने) व्यापारी संकुलाचे बांधकाम सुरु केले असून ते प्रगतिपथावर आहे.

(२) होय.

याबाबत लोकवर्गणी व अनामत रक्कम वेळोवेळी जमा झाल्यावर सदर उपलब्ध रकमेतून ग्रामपंचायतीने स्वत: तांत्रिक मार्गदर्शक घेऊन शासनाच्या कोणत्याही योजनेचा निधी न वापरता व्यापारी संकुलाचे बांधकाम सुरु केले आहे. मात्र अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३.१६ कोटी एकाचवेळी उपलब्ध होत नसल्याने कामाचे निविदा काढण्यात आलेला नाही.

(३) नाही.

सदर जागा १९६५ पासून ग्रामपंचायतीचे ताब्यात असून त्याचा वापर मार्केट यार्ड म्हणून होत आहे. त्यामुळे अशी बाब नाही.

(४) नाही.

ग्रामपंचायत ग्रामसभा दिनांक ०७.०४.२०१३ रोजी ठराव करुन २ मधील बाब क्र १४ व १५ अन्वये ग्रामपंचायत गाळा भाडे अनामत रक्कम ठरविण्यात आली आहे.

(५) नाही.

सदर अनामत व लोकवर्गणीची रक्कम स्वतंत्र बॅक खाते उघडून त्या खात्यात धनादेशाद्वारे जमा केली आहे.

(६) नाही.

सदर प्रकरणी चौकशी केली असता, गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(७) अशी बाब नाही.

ठाणे, पुणे, रत्नागिरी व नागपूर येथील मनोरुग्णालयांचे खाजगीकरण करण्याबाबत

(६४) * ८९८१ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, पुणे, रत्नागिरी व नागपूर येथील मनोरुग्णालयांचे खाजगीकरण करण्याबाबत राज्य शासनाने विचार करावा अशी सूचना करीत या रुग्णालयाचा दर्जा वाढवण्यासाठी नेमके काय केले जाणार आहे याचे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने शासनाला दिल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाने केलेल्या आदेशानुसार राज्य शासनाने राज्यातील मनोरुग्णालयाचा दर्जा वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) व (२) चारही प्रादेशिक मनोरुग्णालयाचे खाजगीकरण करण्याबाबतची सुचना मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशात केलेली नाही. तथापि, मा. उच्च न्यायालयाने दिनांक २७.०४.२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले असून मनोरुग्णालयांमध्ये स्वच्छता गृहांची संख्या वाढविणे, स्वच्छता सेवेचे बळकटीकरण, ईनिविदा पध्दतीने आहार, रिक्त पदे भरणे आदीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच रुग्णांसाठी मानसिक तज्ञांकडून उपचार व जनजागृती कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत रद्द केलेली पदे पुन्हा कार्यरत करण्याबाबत

(६५) * १०१७५ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या राज्यातील २५६२ पदांवरील कर्मचाऱ्यांना कमी करण्याचा निर्णय सरकारने माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या आरोग्य विभागातील रिक्त पदांची संख्या मोठी असताना वरील पदे रिक्त केल्याने आरोग्य विषयक अभियान, उपक्रमांवर त्याचा गंभीर परिणाम झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अभियांनातर्गत काम केलेल्या श्री. राहूल डुंबरे या कर्मचा-याने सहा महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने दिनांक १४ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत रद्द केलेली पदे पुर्ववत सुरु ठेवण्याबाबत सातत्याने मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, तदनुसार सदर पदे पुन्हा कार्यरत ठेवण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मानव संसाधन सुसूत्रिकरण करण्यात आले असून संबंधित विभाग प्रमुख यांच्या समितीने कामाचे स्वरुप लक्षात घेऊन आवश्यकता नसलेली ६०० पदे कमी करण्याची शिफारस केली. त्यानुसार सदर ६०० पदांपैकी २१२ रिक्त पदे रद्द करुन उर्वरीत ३८८ पदांपैकी ५४ पदांवर निवृत्त शासकीय अधिकारी नियुक्त करण्यात आले होते. त्यांच्या सेवा कमी करण्यात आल्या. उर्वरीत ३३४ पदांवरील कार्यरत कर्मचा-यांचे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान व राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत रिक्त असलेल्या पदावर समायोजन करण्यात आले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे नाही.

मयत श्री.राहुल डूंबरे हे जिल्हा क्षयरोग केंद्र, भंडारा या कार्यालयाकडे वरिष्ठ उपचार पर्यवेक्षक (STS) या कंत्राटी पदावर लाखांदुर टि.बी.युनिट जिल्हा भंडारा येथे दिनांक ३०.१०.२०१३ पासुन कार्यरत होते. त्यांचे नोव्हेंबर २०१४ ते मार्च २०१५ पर्यंतचे वेतन दिनांक ०५.०३.२०१५ रोजी त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहे. दिनांक ०७.०३.२०१५ पासून ते कामावर गैरहजर होते. दिनांक १३.०३.२०१५ रोजी त्यांच्या मृतदेह पोलिसांना नदीपात्रात आढळून आला. श्री.डूंबरे यांनी आत्महत्या केली असल्याबाबत पोलिसांनी अकस्मात मृत्यू अहवालामध्ये नमूद केले असून आत्महत्येचे कारण स्पष्ट झालेले नाही.

(४) हे खरे आहे.

(५) मानव संसाधन सुसूत्रिकरणानुसार संबंधित विभाग प्रमुख यांच्या समितीने शिफारस केल्यानुसार कामाचे स्वरुप लक्षात घेऊन केवळ आवश्यकता नसलेली पदे रद्द करण्यात आली असून आवश्यकता असलेली पदे कार्यरत राहणार आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मूल वनपरिक्षेत्र अंतर्गत दहेगांव (जि.चंद्रपूर) येथील वन व्यवस्थापन समितीने बांबू रोपवनात केलेला गैरव्यवहार

(६६) * **७४२५ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूल वनपरिक्षेत्र अंतर्गत दहेगांव (जि.चंद्रपूर) येथील वन व्यवस्थापन समितीतर्फे कक्ष क्र. ५५१७ मधील २५ हेक्टर जागेवर सन २०११ मध्ये बांबू रोपवन करण्यात येवून त्यावर जवळपास २० लाख ३३ हजार रुपये खर्च करण्यात येवूनही सद्य:स्थितीत सदर जागेवर प्रत्यक्षात एकही बांबू रोपटे उपलब्ध नसल्याचे दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मराठवाडयात रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(६७) * ७४९७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयात सध्या १२९ सिंचन प्रकल्प निधी अभावी अपूर्ण अवस्थेत आहेत, यात १३ मोठे, १४ मध्यम आणि १०३ लघु प्रकल्प आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनस्त असलेल्या उक्त प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी १२ हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाडयातील दुष्काळी परिस्थिती आणि सिंचन सुविधांचा अभाव लक्षात घेता अर्धवट अवस्थेतील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडील ८ मोठे, ७ मध्यम व ४९ लपा असे ६४ प्रकल्प आणि महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडील १ मोठे व मध्यम व ५ लपा असे ७ प्रकल्प असे एकदंरीत ७१ प्रकल्प मराठवाडयात बांधकामाधीन आहेत.

(२) होय.

(३) अर्थोपायाची स्थिती व मा. राज्यपाल महोदयांचे निदेश यानूसार निधी उपलब्ध करुन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

संगमेश्वर (जि.रत्नागिरी) पंचायत समितीमध्ये झालेला गैरव्यवहार

(६८) * ६७०० श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३८६४ ला दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) पंचायत समितीमध्ये शेतकऱ्यांना सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात ५० टक्के अनुदान व ५० टक्के शेतकऱ्यांचा सहभाग या योजनेतून साहित्याचे वाटप करताना शेतकऱ्यांकडील ५० टक्के रक्कम पंचायत समितीमध्ये जमा न करता एकूण रुपये १८ लाख ३६ हजार ५९८ इतकी रक्कम कृषी अधिकारी श्री.कणसे यांनी स्वत:कडे ठेवून घेतली, श्री.कणसे यांनी सदर रकमेचा अपहार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.कणसे, कृषी अधिकारी यांनी एवढी रक्कम गैरमार्गाने स्वत:कडे ठेवल्याने त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला आहे काय,

(३) असल्यास, गैरमार्गाने स्वत:कडे ठेवलेली रक्कम दि. ९ ऑक्टोबर, २०१४ रोजी भरणा केली ती रक्कम व्याजासह वसूल केली आहे काय,
(४) श्री.कणसे, कृषी अधिकारी यांना सेवेतून केंव्हा निलंबित करण्यात आले ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) श्री. कणसे, कृषी अधिकारी यांनी १२८ दिवस सदर रक्कमेचा अपहार केला आहे.
(२) संबधितावर फौजदारी गुन्हा दाखल केलेला नाही.
(३) नाही, तथापि, व्याजाच्या रक्कमेपैकी रु. १०,०००/- दि. १३/७/२०१५ रोजी भरणा केली आहे. उर्वरीत रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) श्री. कणसे कृषी अधिकारी यांस दि. १६/१/२०१५ पासून निलंबित करण्यांत आले होते.

पुसद तालुक्यातील (जि.यवतमाळ) प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमध्ये कर्मचारी अनुपस्थित असल्याबाबत

(६९) * १०५३० श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुसद तालुक्यात (जि.यवतमाळ) सहा प्राथमिक आरोग्य केंद्र व ४७ उपकेंद्रांपैकी बहुतेक प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे यामध्ये कर्मचारी उपस्थित राहत नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर केंद्रांमध्ये कर्मचारी नियमित उपस्थित राहून रुग्णांना योग्य आरोग्य सेवा मिळावी म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) व (२) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रातील सर्व कर्मचारी मुख्यालयी उपस्थित राहुन रुग्णांना योग्य आरोग्य सेवा देतात, असे चौकशी अंती आढळून आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

उजनी धरणातून सोलापूर जिल्हयासाठी पाणी सोडण्याबाबत

(७०) * ८७१६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूरसाठी उजनीतून साधारण सहा ते सात हजार क्युसेक्सेन साडेपाच टीएमसी पाणी सोडून औज बंधारा भरुन घेतला जाईल तसेच जिल्हयातील सिंचनासाठी उन्हाळी हंगामाचे आवर्तन म्हणून सात टिएमसी पाणी सोडण्याचा निर्णय लोकप्रतिनिधी व प्रशासन यांच्या बैठकीत झाला असल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उजनीतून सोलापूरसाठी पाणी उशीरा का सोडण्यात आले आहे, त्यामुळे पाण्याची मोठी गैरसोय झाली असल्याने दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) अंशतः खरे आहे.

दिनांक २४/०३/२०१५ रोजी मा.मंत्री जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली उजनी पाणी नियोजनाबाबतचे बैठकीत, कालव्यातून उन्हाळी सिंचन आवर्तनासाठी ७.०० टीएमसी, सिना माढा उसिंयो उन्हाळी आवर्तनासाठी ०.७० टीएमसी, सीना नदी (बोगदा) उन्हाळी सिंचन आतर्वनासाठी ३.०० टीएमसी व व भीमा नदी (पिण्यासाठी) प्रत्येकी ५.५० टीएमसी ची दोन आवर्तने असे एकूण २१.७० टीएमसी पाणी सोडण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार एकूण २१.८७ टीएमसी पाणी प्रत्यक्षात सोडण्यात आले आहे.

(२) दिनांक २५/०३/२०१५ ते दिनांक ०४/०४/२०१५ या कालावधीत भीमा नदीतून पाणी सोडण्यात आले. त्यातून सोलापूर शहरास पाणी पुरवठा करणा-या औंज व चिंचपूर को.प.बंधाऱ्यात पाणी सोडण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे शिवणसई (ता.वसई, जि.पालघर) येथील संरक्षित वनजमिनीवर बेकायदेशीररित्या रिसॉर्ट उभारल्याबाबत

(७१) * ९६१५ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिवणसई (ता.वसई, जि.पालघर) येथील संरक्षित वन जमीन स.न. ८७ मध्ये परमार बिल्डरकडून बेकायदेशीररित्या रिसॉर्ट उभारण्यात आले असून स्थानिक आदिवासींनी याप्रकरणी मा. राज्यमंत्री (वने) यांच्याकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच आदिवासींना शेतीसाठी देण्यात आलेल्या वनजमिनी त्यांना तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) व (२) मौजे शिवणसई (ता. वसई, जि. पालघर) येथील संरक्षित वन सर्व्हे क्र. ८७ मधील एकूण २१.३२ हे क्षेत्रामध्ये श्री. परमार, बिल्डर यांनी प्रत्यक्षात काही बांधकाम (कुंपण, लॉन इ.) केल्याने श्री. नितेश परमार यांचे विरुध्द दिनांक १३.११.२०१३ रोजी माजिवली राऊंड वनगुन्हा क्र. २ई/२०१३-१४ नोंद करण्यात आला असून त्याआधारे संबंधित आरोपीस अटक करुन मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वसई यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. मा. न्यायालयाने सदर आरोपीस जमिनावर मुक्त केले आहे. वन क्षेत्रातील बांधकाम नष्ट करुन क्षेत्र अतिक्रमण मुक्त करणेत आले.

(३) सदर जमिनी यापूर्वीच महसूल खात्याकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत. या जमिनींचे ७/१२ उताऱ्यावर आदिवासी व भूमिहीन यांचे नाव असून सद्य:स्थितीत आदिवासी सदरची जमिन कसत आहे. मात्र सर्व्हे क्र. ८७ प्लॉट क्र. १८ १९,२१,२२ प्रत्येकी १.६२ हे. क्षेत्र शमसुद्दीन मोबीन खान यांनी खरेदी केले असून त्यांना महसूल विभागामार्फत खरेदी, विक्री औद्योगिक प्रयोजनार्थ देण्यात आलेली परवानगी रद्द करण्याबाबत संबंधितांनी कार्यवाही करण्याबाबतच्या जिल्हाधिकारी, पालघर यांना सूचना दिलेल्या आहेत. मात्र श्री. अफजल मोबीन खान यांनी मा. दिवाणी न्यायालय (व.स्तर) वसई यांच्या न्यायालयात आर.सी.एस.क्र/४९२/२०१३ अन्वये दावा दाखल केलेला असून सदरहू दाव्यामध्ये मा. दिवाणी न्यायालय, वसई यांनी पुढील आदेश होईपर्यंत "जैसै थे" परिस्थिती ठेवणेबाबत दिनांक २४/०९/२०१३ च्या पत्रान्वये अन्वये कळविलेले असल्याने प्रस्तुत बाबी प्रथम मा. न्यायालयाच्या लेखी निदर्शनास आणून त्यांचे पूर्व परवानगीने सदर पुर्नविलोकनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करुन तसा अहवाल सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी दिनांक ३१.३.२०१५ रोजी उप विभागीय अधिकारी, वसई यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मालोंड-मालंड (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील गड नदीवरील तिरावर बंधारा बांधण्याबाबत

(७२) * **९८२६ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालोंड-मालंड (ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील गड नदीवरील पाणवठा तिरावर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्याबाबतची मागणी तेथील ग्रामस्थ, कोकण विकास आघाडी तसेच तरुण उत्कर्ष मंडळ, मालोंड या सामाजिक संस्थांचे पदाधिकारी यांनी लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे गेल्या अनेक वर्षापासून ते आजतागायत करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मालोंड-मालंड येथील गड नदीवर बंधारा बांधण्याच्या कामास शासनाने सन २०११ मध्ये प्रशासकीय मान्यता देऊन माहे जून, २०१४ मध्ये या कामाच्या निविदा देखील काढण्यात आल्या होत्या, तथापि, सार्वजनिक निवडणूकीच्या कारणास्तव माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये त्या रद्द करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्याचे काम तातडीने सुरु करण्याबाबत दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी मा.जलसंपदा मंत्री, दिनांक २६ मे, २०१५ रोजी मा.जलसंधारण मंत्री, तसेच अधिक्षक अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, ठाणे यांना पत्र निवेदन सादर करण्यात येऊनही त्याबाबत अद्याप कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित ग्रामस्थ, सामाजिक संस्था तसेच लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचे दिनांक १२ डिसेंबर, २०१३ चे निर्णयान्वये रुपये ४८९.८७ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच महामंडळाचे दिनांक १९ ऑगस्ट, २०१४ च्या पत्रान्वये निविदा प्रक्रिया सुरू करण्याच्या प्रस्तावास देण्यात आलेली मान्यता रद्द करण्यात आली आहे.

(३) व (४) अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या संचालक मंडळाची दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी संपन्न झालेल्या ४८ व्या बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या ठरावानुसार, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत दिनांक १ एप्रिल, २०१४ नंतर तसेच दिनांक १ एप्रिल, २०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता दिलेल्या परंतु प्रत्यक्षात क्षेत्रीय कामे सुरू झाली नाहीत अशा सर्व योजनांची (० ते २५० हेक्टर) तांत्रिक व्यवहार्यता तपासण्यासाठी पुणे व नागपूर येथे कार्यरत दोन मुख्य अभियंते तसेच जलसंपदा विभागाचा एक अभियंता यांची समिती शासन निर्णय, जलसंधारण विभाग, दिनांक ८ मे, २०१५ अन्वये गठीत करण्यात आली आहे. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यवाहीचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

लोहा तालुक्यात (जि.नांदेड) येथील परिसरात अवैध वृक्षतोड आणि चंदन व सागवानाची तस्करी होत असल्याबाबत

(७३) * ८९३४ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा तालुक्यातील (जि.नांदेड) परिसरात अवैध वृक्षतोड मोठया प्रमाणात होत असून चंदन व सागवानाची तस्करी होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महिला बचत गटांना ठराविक रक्कमेपर्यंत विना टेंडर कामे देण्याबाबत

(७४) * ९९२० डॉ.अपूर्व हिरे : तारांकित स्वीकृत प्रश्न क्रमांक ३१८२ ला दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिलांचे सबलीकरण व सक्षमीकरणांतर्गत महिला बचत गटांना ठराविक रकमेपर्यंत विना टेंडर कामे देण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पुढे कोणता निर्णय घेण्यांत आला व निर्णयाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) तसेच, या निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून केली जाणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) नाही.

(२), (३) व (४) महिला बचत गटांना ५० टक्के आरक्षित कामे विनानिवीदा देण्याचा प्रस्ताव उद्योग उर्जा व कामगार विभागास सादर केला असता त्यांनी मा. उच्च न्यायालय, नागपूर बेंच येथे दाखल झालेल्या याचिका क्र. २५४५/२०१२ प्रकरणी मा. न्यायालयाने उशा प्रकारची दरनिश्चिती विनाटेंडर करुन नये असे आदेश दिले आहेत, त्यावर विधी व न्याय विभागानेही यापुढे विना निविदा/टेंडर दर निश्चिती केल्यास तो मा. उच्च न्यायालयाच्या अवमान ठरेल असे अभिप्राय दिले आहेत. त्यामुळे आरक्षित बाबींसाठी दरनिश्चीती विनाटेंडर पध्दतीने करता येणार नाही. सबब महिला बचत गटांना विनाटेंडर ५०% काम देण्याची योजना राबविण्याबाबतचे प्रस्तावित धोरण प्रचलित खरेदी पध्दतीत मोडत नाही असे अभिप्राय दिले आहेत. सदर अभिप्रायास अनुसरुन या विभागामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत विविध योजनांमध्ये अल्पसंख्य लाभार्थ्यांना मंजूर झालेली घरकुले

(७५) * **१००२३ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत विविध योजनांमध्ये अल्पसंख्य लाभार्थ्यांना मंजूर झालेली सुमारे ३०० घरकुले शासनाचा निधी प्राप्त होवूनही न बांधल्यामुळे रक्कम शासनाला परत करावी लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व तद्नुसार घरकुलासाठी मंजूर असलेला निधी परत करावा लागल्याप्रकरणी संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

उत्तमसिंग चव्हाण
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.